अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ७ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## मुख्याध्यापकास मारहाण; शिक्षक पतीसह ६ जणांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/माळशिरस

आपली पत्नी रजेचा अर्ज दिली असताना तिला फोन का केला? या कारणावरून कार्यालयात घुसून मुख्याध्यापकास मारहाण करण्यात आली. ही घटना श्रीपुर (ता.माळशिरस) येथील इंदिराबाई आगाशे इंग्लिश स्कूलमध्ये शनिवारी सकाळच्या सुमारास घडली . या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी त्याच शाळेतील शिक्षिकेच्या पतीसह ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

यासंदर्भात श्रीपुर येथील इंदिराबाई आगाशे इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक संतोष सूर्यवंशी (वय ४४ रा.अकलूज) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी श्रीकांत कडलास्कर, राजस्व नाईकनवरे (रा. श्रीपुर) आणि अनोळखी ६ इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. श्रीकांत कडलासकर यांची पत्नी त्या शाळेत शिक्षिका आहेत . आजारी असल्याने त्यांनी रजेचा अर्ज दिला होता. असे असताना मुख्याध्यापक सूर्यवंशी यांनी त्यांना फोन केला होता. त्याचा राग धरून कडलासकर आणि त्याच्या साथीदारांनी मुख्याध्यापकास शाळेत मारहाण केली. अशी नोंद अकलूज पोलिसात झाली आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत .

# अजितदादांनी आखली 'नवी खेळी' पाटलांनाही पडणार 'सत्तेची बेडी'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी



केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपचे किंगमेकर अमित शहा हे रविवारी पुण्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर मोठी राजकीय उलथापालथ झाली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू असणारे जयंत पाटील यांनी शहा यांची भेट घेतल्याच्या बातमीने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. काही आमदारांसमवेत जयंतराव हे महायुतीच्या सत्तेत जाणार असून आगामी मंत्रीमंडळाच्या विस्तारात त्यांची मंत्रीपदावर वर्णी लावणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. शहा आणि पाटील यांची भेट घडवून आणण्यात अजितदादांनी शिष्टाई केल्याचे सांगण्यात येते. सत्तेत आपली ताकत वाढवण्यासाठी तसेच काकांना शह देण्यासाठी अजितदादांनी नवी खेळी आखल्याचे सांगण्यात येते.त्यामुळे पाटीलही सत्तेच्या बेडीत अडकणार असे दिसते. शरदरावांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा देतो म्हटल्यानंतर जयंतराव हे त्यांच्या देखतच अश्रू ढाळत पवारांवरची निष्ठा दाखवून दिली होती. तेच जयंतराव आता शरदरावांची साथ सोडणार असल्याच्या शक्यतेने शरदरावांच्या राष्ट्रवादीत काळजीचे वातावरण पसरले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एवढेच नाही तर अजित पवार यांनी अमित शहा आणि जयंत पाटील यांच्या भेटीसाठी मध्यस्थी केल्याचीही चर्चा आहे. जयंत पाटील यांचा शिंदे-फडणवीस-पवार सरकारमध्ये समावेश होण्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

रविवारी सकाळी पुण्याला येण्या अगोदर मुंबईतील जे. डब्ल्यू. मॅरिएट हॉटेलमध्ये शहा आणि जयंत पाटील यांची भेट झाल्याची चर्चा आहे. या भेटीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जयंत पाटील यांना फोन केला, अशी चर्चा आहे. तर दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मध्यस्थी केली असल्याचे बोलले जात आहे. जयंत पाटील हे शहांच्या भेटीनंतर शरद पवारांच्या भेटीसाठी 'सिल्व्हर ओक'ला गेले. तिथे त्यांनी पक्षाध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. या भेटींच्या चर्चेमुळे राष्ट्रवादी काँग्रेसबद्दलचा संभ्रम वाढला आहे.



## गुपचूप अमित शहांची भेट घेतल्याची चर्चा आगामी विस्तारात मंत्रीपदाची लॉटरी?

### भेटीचे वृत्त फेटाळले

पाटील यांनी दुपारी तीन वाजता माध्यमांसमोर येऊन याविषयी खुलासा केला. माध्यमांमध्ये माझ्याबद्दल गैरसमज पसरवला जात असल्याचे म्हटले. मी शरद पवारांना सोडून कुठेही जाणार नाही. अमित शहांसोबत भेट झाल्याचेही त्यांनी नाकारले. पवारांची काल संध्याकाळी आणि आज सकाळी अशी दोन वेळा भेट घेतल्याचे सांगत जयंत पाटील म्हणाले, माझ्याबद्दल महाराष्ट्रातील माध्यमे गैरसमज पसरवत आहेत. या भेटीगाठींच्या चर्चेमुळे माझी करमणूक होत आहे आणि निगेटिव्ह पद्धतीने माझी प्रसिद्धीही होत आहे. माझ्यावर कोणाचाही दबाव नाही. भाजपसोबत जाण्यासाठी कोणत्याही नेत्याने मला संपर्क केला नाही किंवा माझ्यासोबत चर्चाही केलेली नाही.

### ...तर पवारांसोबत कोण?

पाटील हे अजित पवारांसोबत गेले तर शरद पवारांचे नातू रोहित पवार आणि ठाण्यातील मुंब्रा–कळवा मतदारसंघाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे दोनच मोठे चेहरे पवारांसोबत राहण्याची शक्यता आहे. पाटील यांच्यासोबत त्यांचे भाचे आमदार प्राजक्त तनपुरे, माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, आमदार भुसारा हे अजित पवारांसोबत सत्तेत सहभागी होऊ इच्छित असल्याची चर्चा आहे.

### पाटलांना कोणते खाते हवे?

महाविकास आघाडी सरकारच्या काळात पाटील यांच्याकडे जलसंपदा खाते होते. पाटील हे अजित पवारांसोबत सत्तेत सहभागी झाले तर त्यांना जलसंपदा खाते हवे आहे. हे खाते सध्या भाजप नेते आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. त्यामुळे या खात्यावरुन राज्यपातळीवर दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये एकमत होऊ शकत नसल्याची चर्चा आहे. जलसंपदा खाते हवे असेल तर केंद्रीय नेत्यांसोबतच चर्चा करावी लागेल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### एकाकी पडल्याची भावना

राष्ट्रवादीतील एक बडा नेता शरद पवारांचा हात सोडून अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाणार, अशी चर्चा शनिवारीच रंगलेली होती.हा नेता कोण याविषयी राज्यात कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. दुसऱ्याच दिवशी जयंत पाटलांचे नाव समोर आले. शरदरावांच्या पक्षात एकाकी पडल्याची पाटलांची भावना झाली असून त्यांनी त्यांचा हा निर्णय सांगलीतील कार्यकर्त्यांना कळवला असल्याचे सांगण्यात येते.

## नातवाने आजीच्या अंगावर डिझेल टाकून जाळले

सुराज्य/कुर्डूवाडी



- शेतातील कामाचा मोबदला दिला नसल्याचा राग
- माढा तालुक्यातील लऊळ येथील घटना

शेतातील कामाचा मोबदला दिला नसल्याचा राग अनावर झाल्याने नातवाने ६५ वर्षीय आजीच्या अंगावर डिझेल टाकून पेटवून दिल्याने आजीचा जळून मृत्यू झाला. ही घटना माढा तालुक्यातील लऊळ येथे रविवारी सकाळी ८.३० ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात कुलदीप संजय कोकाटे (रा. कोकाटे चांदगुडे वस्ती लऊळ) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी संशयित आरोपी हर्षद शंभूदेव शिंदे (वय अंदाजे २२ सध्या रा. राजगुरुनगर पुणे) यास अटक केली आहे. शांताबाई पंढरीनाथ शिंदे (वय ६५ रा. भवर वस्ती लऊळ ता.माढा) असे मरण पावलेल्या आजीचे नाव आहे.

फिर्यादी कुलदीप कोकाटे सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास गाईच्या धारा काढून दूध डेअरीवर घालण्यासाठी नेहमीप्रमाणे मोटारसायकलवर समर्थ डेअरी येथे गेले होते. दूध देऊन परत सकाळी ९.३० वाजता घराकडे जात असताना भवर वस्ती, लऊळ येथील कोकाटे यांच्या आजी- आजोबा यांच्या घराजवळ आले असता त्यांच्या घरासमोरील चिंचेच्या झाडाखाली मोठी आग लागलेली दिसली म्हणुन मोटारसायकल रोडवर थांबवून काय झाले आहे, ते पाहण्यासाठी ते जवळ गेले असता आजी शांताबाई शिंदे आग लागून पेटलेली होती. त्यावेळी त्याच ठिकाणी थोड्या अंतरावर कोकाटे यांच्या मामाचा मुलगा हर्षद संभुदेव शिंदे हा पळत जात असताना दिसला.

त्यास त्यांनी हर्षद अशी हाक मारली असता त्याने मागे वळून पाहिले व तो तसाच पुढे पळून गेला. त्यावेळी आजीच्या घराचे समोर स्टिलच्या बादल्या, पातेले, स्वयंपाकाचे सामान हे अस्ताव्यस्त पडलेले होते. जमिनीवर डिझेल पडले होते. त्यानंतर कोकाटे यांनी घरी जाऊन त्यांच्या आई-वडिलांना घेवून आजी शांताबाई हिच्या घरी आले. आवाजाने आजूबाजुचे लोक जमा झाले असता त्यांच्या मदतीने आजी शांताबाई हिस लागलेली आग विझवली.

हर्षद संभुदेव शिंदे याने आजी शांताबाई पंढरीनाथ शिंदे हिचे अंगावर डिझेल टाकून तिला पेटवून देवून जिवे ठार मारले आहे. म्हणून हर्षद संभुदेव शिंदे याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

कुर्डूवाडी पोलिसांनी या घटनेचे माहिती मिळताच गांभीर्य लक्षात घेता त्वरित संशयित आरोपी हर्षद शिंदे यास अटक केली आहे.अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत वाघमारे करीत आहेत.

## रेल्वे अपघात; जखमी प्रवाशाचा मृत्यू

सोलापूर : विजयपूर ते रायचूर पॅसेंजर या गाडीत प्रवास करताना रेल्वे स्थानकाजवळ जखमी झालेले ४० वर्षीय अनोळखी इसम सोलापुरातील शासकीय रुग्णालयात शनिवारी सायंकाळी मयत झाले.

काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास सोलापूर रेल्वे स्थानकाजवळ हा प्रकार घडला होता. जखमी इसमाला रेल्वे पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. दरम्यान ते सायंकाळी मयत झाले. या घटनेची नोंद लोहमार्ग पोलिसात झाली असून हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.




लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सोलापुरातील विविध मंडळांनी रविवारी अण्णाभाऊ यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली. या मिरवणुकीने जयंती उत्सावाची सांगता झाली.

## पदस्पर्श व मुख दर्शन सुलभ व्हावे यावर अधिक भर

सुराज्य/पंढरपूर

- विकास आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात
- मंदिर समिती सदस्यांकडून पाहणी

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धन व संरक्षण आराखड्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून या अंतर्गत आज मंदिर समिती सदस्यांनी पाहणी करून संबंधित यंत्रणेस सूचना दिल्या. यामध्ये येणाऱ्या भाविकांना पदस्पर्श व मुख दर्शन सुलभ व्हावे यावर अधिक भर दिला जाणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीची बैठक भक्त निवास येथे पार पडली. यास सदस्य ज्ञानेश्वरर महाराज जळगावकर, प्रकाश महाराज जवंजाळ, संभाजी शिंदे, दिनेश कदम, शकुंतला नडगिरे, ॲड. माधवी निगडे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड आदी उपस्थित होते.

राज्य शासनाने श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धन व संरक्षणासाठी ७३ कोटी रूपये मंजूर केले असून याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. तेजस्विनी आफळे यांच्या माध्यमातून सदर मंदिराचा आराखडा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. आफळे यांच्या समवेत आज मंदिर समितीच्या सदस्य व अधिकाऱ्यांनी संपूर्ण मंदिराची पाहणी करून आवश्यक त्या सूचना केल्या. याबाबत बोलताना ओसेकर महाराज यांनी, आराखडा बनविताना आफळे यांना पदस्पर्श व मुख दर्शन जास्तीतजास्त सुलभ कसे होईल यावर काम करण्याची सूचना केली असल्याचे सांगितले. तसेच सभामंडपात सप्ताह, भजन, किर्तन आदी धार्मिक कार्यक्रम सतत सुरू



असतात. यामुळे मुखदर्शनाची रांग सभामंडपातून न आणता बाहेरून आणण्याची सूचना करण्यात आली. येत्या तीन दिवसात प्राथमिक आराखडा तयार केला जाणार असून यावर चर्चा होऊन लवकरच अंतिम आराखडा बनविला जाणार आहे. सदर आराखडा राज्य शासनाकडे मंजुरीस पाठवून लवकरच मंदिराचे काम सुरू होणार असल्याची माहिती ओसेकर महाराज यांनी दिली.

## २४ तासांत पैसे न देणाऱ्या मार्केट कमिट्यांवर कारवाई

### पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिला इषारा

सुराज्य/पंढरपूर

**राज्याचे पणन मंत्री अब्दुल सत्तार हे रविवारी पंढरपूरच्या दौऱ्यावर होते.राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना १५ ऑगस्टपूर्वी अनुदान मिळेल, असे सांगतानाच कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्री केलेल्या शेतमालाला २४ तासांमध्ये पैसे नाही दिले तर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.**

सत्तार हे त्यांच्या मतदारसंघातील वारकऱ्यांच्या गाथा पारायण कार्यक्रमासाठी पंढरपूरला आले होते.त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

आता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री केलेल्या शेतमालाला २४ तासामध्ये पैसे द्यावे लागणार आहेत. अन्यथा शेतकऱ्यांचे पैसे मिळाले नसल्याची तक्रार आल्यास त्या बाजर समितीवर कारवाई होईल. बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांनी



माल विकल्यावर जवळपास दहा दिवस ते दोन महिन्यांपर्यंत शेतकऱ्यांना पैसे मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे बाजार समित्या आणि व्यापाऱ्यांनी नियम पाळले नाहीत तर त्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल, असेही ते म्हणाले.

यासंदर्भात शेतकऱ्यांकडून अनेक तक्रारी येत होत्या. तसेच बेदाण्याचा सौदा करणारे व्यापारी सॅम्पल म्हणून दीड ते दोन किलो बेदाणे घेत असल्याची तक्रार देखील शेतकऱ्यांकडून येत होती. यामुळे शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान होत असल्याचे सांगण्यात येत होते.

म्हणूनच आता फक्त ५० ते १०० ग्रॅम बेदाणे सॅम्पल म्हणून घेण्याच्या सूचना देखील बाजार समित्यांना देण्यात आलेल्या आहेत. सॅम्पलच्या नावाखाली बेदाण्यांची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर आता कारवाई होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

राज्यात मान्सूनने उशीरा जरी हजेरी लावली असली तरी अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून पंचनामे करुन तातडीने नुकसान भरपाई करण्याची मागणी केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर अतिवृष्टीमुळे ३१ मार्चपर्यंत ज्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यासाठी ५५० कोटी रुपये पुरवणी मागणीत मंजूर झाले आहेत. तसेच १५ ऑगस्टपर्यंत शेतकऱ्यांना मदत मिळणार असल्याचं देखील मंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितलं आहे.

### काय आहे मुख्यमंत्री शिंदेंचा प्लॅन बी?

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ए प्लॅन सगळ्यांना दिसतो, मात्र त्यांचा बी प्लॅन देखील तयार असतो आणि तो कधीच फेल जात नाही, असं सत्तार म्हणाले. आमच्या ५० आमदारांसोबत अजून २५ आमदार निवडून आणायची ताकद मुख्यमंत्री शिंदेंमध्ये असल्याचा विश्वास सत्तार यांनी व्यक्त केला.

## तिसरा डोळा


– प्रकाश पोरे



मी तुमच्यावर केलेली टीका मलाही आठवत नाही !!!

# कोचर यांची मनमानी

भारतासह विविध देशांमध्ये मोठा आर्थिक पसारा असलेल्या आयसीआयसी बँकेच्या तोट्याविषयी गेल्या काही महिन्यांपूर्वी देशभर चर्चा होती. पण आता तोट्याविषयीची खरी माहिती उजेडात आली आहे. या बँकेच्या माजी सीईओ चंदा कोचर यांच्या काही निर्णयांमुळे बँकेला १ हजार ०३३ कोटी रुपयांचा तोटा झाल्याची माहिती सीबीआयने दाखल केलेल्या आरोपपत्रातून समोर आली आहे. १० हजारांहून अधिक पानांच्या आरोपपत्रात सीबीआयने चंदा कोचर, त्यांचे पती दीपक कोचर आणि उद्योगपती वेणुगोपाल धूत यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. चंदा कोचर, त्यांचे पती दीपक कोचर आणि धूत यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रातून अनेक धक्कादायक खुलासे झाले आहेत. बँकेने व्हिडिओकॉन समूहाला दिलेल्या १ हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम नॉन परफॉर्मिंग ॲसेट झाली आहे. जेव्हा कर्जदार कर्ज घेतलेली रक्कम परत करू शकत नाही, तेव्हा बँकेचे पैसे अडकतात आणि नंतर ती रक्कम बँक 'एनपीए' म्हणून घोषित केली जाते. या आरोपपत्रातून सीबीआयने आरोप केलाय की, चंदा कोचर यांच्यावर आयसीआयसीआय बँकेची जबाबदारी सोपवली होती. बँकेच्या एमडी आणि सीईओ झाल्यानंतर एक मे २००९ पासून व्हिडिओकॉन ग्रुपला सहा 'रूपी टर्म लोन' मंजूर केले होते. आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे की, जून २००९ ते ऑक्टोबर २०११ दरम्यान, बँकेने समूहाला एकूण १ हजार ८७५ कोटी रुपयांचे रूपी टर्म लोन मंजूर केले. चंदा कोचर या त्या दोन सदस्यीय संचालक समितीच्या अध्यक्षा होत्या, ज्यांनी ऑगस्ट २००९ मध्ये व्हिडिओकॉन इंटरनॅशनल इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडला ३०० कोटी रुपयांचा कर्ज मंजूर केले. हे मुदत कर्ज मंजूर करून गुन्हेगारी कट रचण्यात आला. २६ ऑगस्ट २००९ रोजी, कोचर यांच्या अध्यक्षतेखालील संचालकांच्या समितीने व्हिडिओकॉन इंटरनॅशनल इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडला ३०० कोटी रुपये मंजूर केले. कर्जाची रक्कम ७ सप्टेंबर २००९ रोजी वितरित करण्यात आली.



वयाच्या २२व्या वर्षापासून बँकिंग क्षेत्रात पदार्पण केलेल्या चंदा कोचर वयाच्या ४७ व्या वर्षी सीईओ बनल्या. त्या भारतातील बँकेची सीईओ बनणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. त्याआधी बँकेच्या कॉर्पोरेट आणि रिटेल बँकिंगची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. काही काळ त्या बँकेच्या सीएफओ पदावर देखील होत्या. २००९ साली एमडी आणि सीईओ पदाची जबाबदारी मिळाल्यावर फोर्ब्सच्या यादीत १०० पैकी २० व्या स्थानावर होत्या. जगातील शक्तिशाली महिलांच्या यादीत भारतात सोनिया गांधींनंतर कोचर यांना स्थान देण्यात आले होते. २०११ साली भारत सरकारकडून त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले होते. २००९ ते २०११ दरम्यान आयसीआयसीआय बँकेने व्हिडिओकॉन समूहाला सुमारे १ हजार ८७५ कोटींचे कर्ज दिले होते. मात्र, या आर्थिक व्यवहारांमध्ये गैरप्रकार केल्याचा आरोप कोचर यांच्यावर करण्यात आला. याबाबत प्रारंभी बँकेने कोचर यांची बाजू घेतली होती. मात्र, सीबीआयने तपास सुरू केल्यावर बँकेने भूमिका बदलली आणि जून २०१८ मध्ये निवृत्त न्यायमूर्ती बी. एन. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली गेली. या प्रकरणामुळे चंदा कोचर यांना बँकेचे सीईओपद सोडावे लागले. बँकेच्यावतीने देण्यात आलेल्या नियमबाह्य कर्जामुळे बँकेला आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे, असे सांगण्यात येते. याप्रकरणी चंदा कोचर यांचे पती दीपक कोचर आणि व्हिडिओकॉनचे वेणुगोपाल धूत यांच्याविरोधात सीबीआयने २२ जानेवारी २०१९ रोजी गुन्हा नोंदविला गेलाय. सीबीआयने खरी माहिती उघड केली पण आता पुढे काय होणार? हा प्रश्न देशातून विचारला जाईलच. कारण विजय मल्ल्या आणि नीरव मोदीसारखे बडे प्रस्थ देशातील वित्तीय संस्थांना टोपी घालून परदेशात जाऊन बसले. यापूर्वी बँकांमधील अनेक गैरप्रकार उघडकीस आले. त्याचा छडा अद्याप लागलेला नाही. बँकांमध्ये येणारा पैसा हा जनतेचा असतो. मोठ्या विश्वासाने लोक ठेवींच्या रूपातून पैसा बँकांमध्ये ठेवत असतात. त्यावर अधिकारी आणि बडे प्रस्थ मजा मारत असतात. कोचर पती-पत्नींचे काय होईल हे कुणी सांगू शकत नाही. कारण पुढची न्यायालयीन प्रक्रिया दिरंगाईची ठरत असते. लोक अशी प्रकरणे विसरूनही जातात आणि अशा नियमबाह्य कृत्यांवर पांघरुण पडते. देशात हेच चालले आहे.

## सामाजिक

# लो. टिळक पुरस्कार 'लोकमान्य' नेतृत्वाला

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार दि. १ ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समितीचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. लाखो पुणेकरांच्या साक्षीने आणि राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, माजी मुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत मोदींना गौरविण्यात आले. रोहित, गीताली, प्रणिती हे टिळक कुटुंबीय व्यासपीठावर उपस्थित होते. देशातील कोट्यवधी जनतेने 'लो. टिळक पुरस्कार प्रदान कार्यक्रम' टीव्हीच्या पडद्यावर पाहिला. पण मोदींना पुरस्कार म्हटल्यावर ज्यांचे पोट दुखू लागले, त्या विरोधी पक्षांनी रस्त्यावर निदर्शने करून आपल्या नाकर्तेपणाचे प्रदर्शन केले. संसदेचे पावसाळी अधिवेशन दिल्लीत चालू आहे. पहिल्या दिवशी पंतप्रधान मोदी स्वत: विरोधी बाकांवर बसलेल्या सोनिया गांधींकडे गेले व त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. जो दिलदारपणा पंतप्रधानांकडे आहे, तो विरोधी पक्षांकडे का नाही?

लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार सोहळा हे राजकीय व्यासपीठ नाही. हा सरकारी कार्यक्रमही नाही. लोकमान्य टिळकांच्या नावाने स्थापन केलेल्या स्मारक समितीच्यावतीने देशातील नामवंत व्यक्तीला, ज्याने विविध क्षेत्रांत लक्षणीय व उत्तुंग कामगिरी बजावली आहे किंवा त्या व्यक्तीचे राष्ट्रीय पातळीवर मोठे योगदान आहे, हे पाहूनच हा पुरस्कार दिला जातो. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नातू जयंतराव टिळक यांनी हा पुरस्कार चाळीस वर्षांपूर्वी सुरू केला. जयंतराव टिळक उच्चशिक्षित, प्रतिष्ठित, गुणसंपन्न असे व्यक्तिमत्त्व होते. लोकमान्यांनी स्थापन केलेल्या केसरीचे दैनिकात रूपांतर जयंतरावांनी केले. जयंतराव टिळक हे महाराष्ट्राचे भूषण होते. ते तीन टर्म खासदार होते. पुण्यातून राज्य विधानसभेवर संयुक्त महाराष्ट्र समितीचे आमदार म्हणून निवडून गेले होते. बॅ. ए. आर. अंतुले यांच्या मंत्रिमंडळात ते ऊर्जामंत्री होते. राज्य विधान परिषदेचे ते सोळा वर्षे सभापती होते. विकासाची दृष्टी असणारे बुद्धिमान व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख होती. त्यांचे चिरंजीव केसरीचे संपादक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांनी जयंतरावांची परंपरा तेवढ्याच जोमाने पुढे चालू ठेवली आहे. लोकमान्य टिळक पुरस्कारासाठी निवड करताना स्मारक समितीने कधीच राजकीय दृष्टिकोनातून विचार केलेला नाही. इंदिरा गांधी, प्रणव मुखर्जी, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग, शरद पवार, बाळासाहेब देवरस अशा दिग्गजांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. मग या वर्षीचा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिल्यावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, समाजवादी आणि डाव्या संघटनांनी नाके कशासाठी मुरडली?

**सुशीलकुमार शिंदे हे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलपती आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष असलेल्या शरद पवारांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डी. लिट पदवीने सन्मानित केले आहे. हे दोघेही माजी मुख्यमंत्री आहेत. शरद पवारांच्या पंचाहत्तरीला दिल्लीत झालेल्या कार्यक्रमाला नरेंद्र मोदी, सोनिया गांधी, प्रणव मुखर्जी आणि मुंबईत झालेल्या कार्यक्रमाला उद्धव व राज ठाकरे उपस्थित होते. तेव्हा कुणाला कुणाबद्दल आक्षेप घ्यावासा वाटला नाही, मग पवारांनी मोदींच्या पुरस्कार कार्यक्रमाला जायला नको होते, असा उबाठा सेनेने टाहो का फोडला? नरेंद्र मोदींच्या स्वागताला अजित पवार, सत्कार होताना शेजारी शरद पवार, मंचावर सुशीलकुमार शिंदे आणि बाहेर काळे झेंडे दाखवायला काँग्रेस व राष्ट्रवादीचे कार्यकर्ते. यातून काही तरी शिका, नाहीतर आयुष्यभर झेंडेच हाती घ्यावे लागतील...**



नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रीय पातळीवर उदय झाल्यापासून देशाच्या राजकारणाचा पोतच बदलला. देशाचे पंतप्रधान म्हणून जनतेने त्यांना सलग दुसऱ्यांदा निवडून दिले. जागतिक पातळीवर देशाचे नाव उंचावण्याचे सारे श्रेय मोदी यांच्या कार्यकर्तृत्वालाच आहे. जगात सर्व देशांचा भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. कोविड काळात अमेरिकेसह युरोपातील अनेक संपन्न देश आर्थिकदृष्ट्या ढासळले होते. पण मोदींनी जे भारतासाठी व इतर देशांना मदत देण्यासाठी जे काम केले त्याला तोड नव्हती. अडीच कोटी लसींचे वाटप देशवासीयांना विनामूल्य करून लक्षावधी जनतेचे प्राण त्यांनी वाचवले. न्यायालयीन सर्व अडथळे दूर झाले व त्यांच्या काळातच राम मंदिराच्या उभारणीला वेगाने सुरुवात झाली. जम्मू काश्मीरला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ३७०व्या कलमाचे कवच रद्द करण्याचा धाडसी निर्णय तेच घेऊ शकले. देशाची अर्थव्यवस्था त्यांनी जगात दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आणलीच, पण आता पुढील पाच वर्षांत तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचा त्यांनी संकल्प बोलून दाखवला आहे. तिहेरी तलाक पद्धती रद्द करून लक्षावधी मुस्लीम महिलांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले. 'सबका साथ, सबका विकास' हे सूत्र घेऊन त्यांनी देशात विकासकामांचा धडाका लावला म्हणूनच लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराला पात्र ठरले. गेल्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी आपल्या विकासकामांतूनच लोकमान्यता मिळवली.

'वंदे भारत रेल्वे' ही त्यांचीच देशवासीयांना देणगी आहे. बुलेट ट्रेनचे काम वेगाने चालू आहे. डिजिटल पेमेंट पद्धती अगदी रस्त्यावरच्या भाजीवाल्यापर्यंत पोहोचली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन आणि अर्थव्यवस्था अशा सर्व क्षेत्रांत भारताची घोडदौड चालू आहे. म्हणूनच देशाच्या महानायकाला 'लोकमान्य टिळक पुरस्कार' मिळतो ही देशवासीयांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. पुरस्काराची रक्कम 'नमामि गंगा' प्रकल्पाला देण्याचे त्यांनी जाहीर केले, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहेच. पण वाराणसी व पुणे यांचे नाते कसे जुने आहे, हेही आवर्जून सांगितले.

राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो. राजकारण हे निवडणुकीच्या मैदानात असावे, सत्कार समारंभात नसावे हाच संदेश लोकमान्य टिळक पुरस्काराने दिलेला आहे. संसदीय लोकशाहीत राजकीय सभ्यता पाळली पाहिजे. त्याचेच दर्शन पुण्यात मोदींना दिलेल्या पुरस्काराच्या वेळी दिसून आले. मोदींनी पवारांशी हस्तांदोलन केले, पवारांनी मोदींच्या पाठीवर थाप मारली. मोदींनी अजित पवारांशी हात मिळवला आणि त्यांची पाठ थोपटली. एकनाथ शिंदे यांनी मोदींच्या कार्याची प्रशंसा केली आणि मोदींनीही एकनाथ शिंदेंनी आपला विश्वास सार्थ केल्याचे सूचित केले.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# जगातील सर्वात प्राचीन मार्शल आर्टस्

कलरीपयट्टू हा ह्या धरतीवरचा कदाचित सर्वात प्राचीन मार्शल आर्टस् प्रकार असावा. सुरुवातीला ते मुळात अगस्त्य मुनींनी शिकवले. कारण मार्शल आर्टस् हे केवळ पायाने लाथा मारणे किंवा ठोसे लगावणे एवढेच नाही. ते आपले शरीर शक्य त्या सर्वप्रकारे कसे वापरता येईल, हे शिकण्यासाठी आहे. म्हणून त्यामध्ये केवळ व्यायाम किंवा चपळतेचा समावेश नाही तर त्यामध्ये आपली ऊर्जा व्यवस्था समजून घेणे सुद्धा येते. कल्लरी चिकित्सा आणि कल्लरी मर्मही आहे, ज्यामध्ये शरीराची गुपितं समजून घेऊन आणि विकार त्वरित बरे करून ते पुनर्नव स्थितीत ठेवणे याचा समावेश होतो. पुरेसा वेळ आणि लक्ष देणारे फार थोडे कल्लरी साधक आजच्या जगात आहेत, पण तुम्ही जर त्यात पुरेसे खोलवर गेलात तर तुम्ही स्वाभाविकपणे योगाकडे जाल. कारण अगस्त्य मुनींकडून जे काही येते ते आध्यात्मिक असण्यावाचून दुसऱ्या कुठल्या स्वरूपाचे असूच शकत नाही. परम सत्याच्या शोधासाठी त्यांनी शक्य तो प्रत्येक मार्ग उघड करून ठेवला आहे.

शरीराचे न उलगडलेले पुष्कळ आयाम आहेत. काही कराटे मास्टर आहेत जे फक्त लहानश्या स्पर्शाने सुद्धा तुम्हाला मारू शकतात. स्पर्शाने एखाद्याला मारणे फार मोठी गोष्ट नाही. स्पर्श करून त्यांना भानावर आणणे ही मोठी गोष्ट आहे.

जर आपण फक्त लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठीच प्रयत्न करत असतो तर ते फार सोपे असते. मला ते फार मोठे आव्हान वाटत नाही. परंतु आपल्याला मानवी जीवनाचे गूढ आयाम उघड करायचे आहेत. यासाठी वेगळ्या स्तरावरचे समर्पण आणि लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. निसर्गाने घालून दिलेल्या मर्यादेपलीकडचे जीवन माहीत करून घेण्यासाठी ठराविक प्रकारचे लोक आवश्यक आहेत. ९९.९९% मानवजात त्यांच्या शरीराचा सुद्धा पूर्ण शोध घेत नाहीत. पण तुम्ही जर याचा शोध घेतला तर इथे नुसतं बसून राहून सुद्धा हे शरीर प्रचंड गोष्टी करू शकते. हा योगाचा मार्ग आहे. कल्लरी फक्त त्याची जास्त कृतिशील बाजू आहे.



मार्शल आर्टस् मुख्यत: दक्षिण भारतामध्ये विकसित झाले. अगस्त्य मुनी कमी उंचीचे होते परंतु त्यांनी निरंतर प्रवास केला. त्यांनी मार्शल आर्ट्सचा विकास मुळात वन्य श्वापदांशी लढता यावे यासाठी केला. या भूमीमध्ये वाघांचा वावर फार जास्त होता - आता आपण त्यांची संख्या मोजू शकतो, फक्त हजाराहून थोडे जास्त शिल्लक असतील. पण एक काळ असा होता, ते शेकडो, हजारोंच्या संख्येने इतर धोकादायक जंगली श्वापदांसोबत वावरत होते. वन्य जीवांचा सामना करण्यासाठी अगस्त्य मुनींनी कल्लरीचा विकास केला. जर वाघ समोर आला तर त्याचा कसा सामना करावा. तुम्ही पाहाल, कल्लरीचा साचा अजूनही तोच आहे. हे केवळ माणसांबरोबर लढण्यासाठी नाहीये. तर प्रवास करत असताना वन्यजिवांचा सामना कसा करावा यासाठी, त्यांनी मार्शल आर्टस् थोड्या लोकांना शिकवले. ते अजूनही जिवंत आहे.

**कल्लरी ते कराटे :** जेव्हा लोकांनी हिमालय पार केला तेव्हा त्यांना जंगली लोकांना सामोरे जावे लागले, जे प्रवाशांवर हल्ला करत. वन्यश्वापदांचा सामना कसा करावा यासाठी ते जे काही शिकले त्याचा उपयोग त्यांनी ह्या जंगली माणसांवर केला. जेव्हा त्यांनी ह्याचा वापर माणसांवर करायला सुरुवात केली तेव्हा ह्या मार्शल आर्टस्मध्ये वेगळे परिवर्तन घडून आले. जे मार्शल आर्टस् वाकून केले जात ते उभे राहून केले जाऊ लागले, हे तुम्हाला भारतामधून चीन किंवा दक्षिण पूर्व आशियामध्ये जाताना दिसेल. जेव्हा तुम्ही माणसांबरोबर लढता तेव्हा मारण्यासाठी लढता. वन्य श्वापदांबरोबर तसे नसते. तुम्ही एकदा का दाखवून दिले की तुम्हाला भक्ष्य बनवणे फार कठीण आहे तर ते दूर निघून जातील. म्हणून नैसर्गिकरीत्या मार्शल आर्टस्चा विकास जंगली जीवांपासून संरक्षण करण्याच्या उत्तम पद्धतीपासून ते एखाद्याला मारून टाकण्याच्या पद्धतीपर्यंत झाला. हे परिवर्तन तुम्हाला कल्लरी ते कराटेमध्ये दिसेल.

कालांतराने भारतामध्ये सुद्धा त्यांनी माणसांबरोबर लढायला सुरुवात केली. परंतु त्यांनी ह्या कलेमध्ये फारसा बदल केला नाही. त्याऐवजी त्यांनी शस्त्र उचलली. म्हणून तसं पाहायला गेलं तर कल्लरी लढण्यासाठी कराटे इतकं कार्यक्षम नाही. कारण कराटेमध्ये ते दोन पायांवर सरळ उभे राहतात. कल्लरीमध्ये तुम्ही कमी उंची असलेल्याचा समान करण्याचा प्रयत्न करता. कारण आपण त्याकडे दुसऱ्या माणसांबरोबर लढण्याचे साधन म्हणून पाहात नव्हतो, ते फक्त जंगली श्वापदांचा सामना करण्यासाठी होते.

भारतातील अति प्रभावी अशा पहिल्या पन्नास व्यक्तींमध्ये सद्गुरूंची गणना होते. ते योगी, द्रष्टे आणि न्यूयॉर्क टाइम्सचे सर्वोत्तम विक्री असलेले लेखक आहेत. भारत सरकारने २०१७ मध्ये त्यांना त्यांच्या असाधारण आणि प्रतिष्ठित कार्याबद्दल 'पद्म विभूषण' हा पुरस्कार देऊन गौरवान्वित केले. त्यांनी 'कॉन्शीयस प्लॅनेट-माती वाचवा' ही जगातली सर्वांत मोठी लोकमोहीम सुरू केली आहे, जिला ३.९ अब्ज लोकांनी पाठिंबा नोंदविला आहे.

**- सद्गुरु.**

## जन्म हा अखेरचा

# शिष्यस्थल -१

गुरुच्या अधीन राहून जो गुर्वाज्ञेचे पालन करतो आणि गुरुच्या अनुग्रहाने मोक्षाची इच्छा बाळगतो, त्याला 'शिष्य' म्हणतात. आपल्यावर गुरुकृपा झाली हे कसे समजावे तर जेव्हा आपल्या मनात मोक्षप्राप्तीची इच्छा उत्पन्न होईल, तेव्हा निश्चित गुरुकृपा झाली असे समजावे. मोक्षाची अपेक्षा करणारे खूप कमी असतात. सामान्य माणसांना सर्वकाही हवे असते. परंतु मोक्ष नको असतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थात मोक्षाचा क्रमांक शेवटचा आहे. ज्यांना धर्म पाहिजे असतो, अशी माणसे कमी असतात. अर्थ-कामाची इच्छा असणारे बहुसंख्य असतात. परंतु मोक्षाची इच्छा असणारा लक्षावधीत एखादाच असतो. बहुसंख्य लोकांना धन, कीर्ति, सत्ता इ. हवे असते. सर्व भोगांचा उबग आल्यावर मनुष्य मोक्षप्राप्तीची कामना बाळगतो. सांसारिक वासनांपासून मुक्त झाल्याशिवाय मोक्षाची इच्छा उत्पन्न होत नाही. या नाशिकच्या 'मुक्तिधामात' बसून आपण मोक्षाचा विचार करीत आहोत. इथे बसलेल्या सर्वांच्या मनात मोक्षाची इच्छा असण्याची शक्यता आहे. परंतु इच्छा प्रबळ हवी तरच प्रगती होण्याची शक्यता असते.




एकदा विवेकानंदांकडे एक मनुष्य आला आणि म्हणाला, 'स्वामीजी मला ईश्वर दाखवा. ईश्वरदर्शन करण्याची माझी इच्छा आहे.' तुझ्या मनात ईश्वरदर्शनाची प्रबळ इच्छा आहे का? स्वामीजींनी विचारले, ''होय.'' तो गृहस्थ म्हणाला. स्वामीजी स्नानासाठी नदीवर निघाले होते. त्यांनी गृहस्थाला आपल्याबरोबर येण्यास सांगितले. नदीवर गेल्यावर 'नदीत उतरुन प्रथम स्नान कर' अशी स्वामीजींनी आज्ञा केली.

तो गृहस्थ नदीत उतरला. स्नान करु लागला. तेवढ्यात स्वामीजी त्याच्याजवळ आले आणि त्यांनी त्या गृहस्थाचे डोके पाण्याखाली दाबून धरले. तो कासावीस झाला. मग त्यांनी त्याला सोडले. असे दोन तीन वेळा स्वामीजींनी केल्यावर तो गृहस्थ घाबरुन पाण्याबाहेर आला. आणखी एक दोन वेळा जर स्वामीजींनी त्याच्यावर हा प्रयोग केला असता तर तो बिचारा खरोखरच ईश्वराकडे गेला असता. त्याने स्वामीजींना विचारले, 'तुम्ही मला ईश्वर दाखवण्यासाठी आणले की पाण्यात बुडवून मारण्यासाठी'? **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# दोन राष्ट्रगीतांचे जनक गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपुत्र, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर-सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी 'भानुसिंह' या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला. परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवीशिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हेंबर १९१३ रोजी 'गीतांजली' या रचनेबद्दल स्विडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवींद्रनाथांनीच केले होते.



रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जनगणमन व 'आमार शोनार बांग्ला' ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्यासाठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना 'गुरुदेव' असे संबोधले जाते. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते. यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

## - संतविचार -



डॉ. देविदास गुरव, सोलापूर

# जेथ कामाची अतिप्रीती

**'जेथ कामाची अतिप्रीती ।तेथ लोभाची दृढ वस्ती ।।**
**कामाची जेथ प्राप्ती । तेथ महाख्याती क्रोधाची ।।**
**(ए. भा.,११-२३३)**

काम, क्रोध व लोभ हे तीनही विकार मानवाच्या साऱ्या पातकाचे मूळ आहेत. वासनेच्या तीन दुर्गुणामुळे माणसाचे माणूसपण नष्ट होते. आसुरी षडरिपूंच्या प्राबल्यामुळे एक तर तो पशू बनतो नाहीतर राक्षस बनतो. 'कामाशी' अतिप्रीती जडली की 'लोभ' वाढत जातो. जेव्हा दोन्ही गोष्टी मिळेना झाल्या की क्रोधाचा विस्फोट होतो. हातून भयंकर अनिष्ट घडते. म्हणून नैसर्गिक विकारांना ताब्यात ठेवले तरच मानवाच्या ठायी सद्गुण वाढीस लागतात व त्याच्यातील माणूसपण कायम राहते.

नाथमाऊलींनी भ्रष्ट आचरणाचे कारण, तिन्ही विकारांचे परस्पर संबंध अगदी स्पष्टपणे सांगून ठेवले आहे. सर्वच संतांनी शुद्ध आचरण, निष्कलंक चारित्र्य व निष्काम जीवनाचा मार्ग आपणास सांगितला आहे. काम, क्रोध नि लोभ हे विकार आपले वैरी केव्हा होतात व ते केव्हा मानवाला मोहित करून चुकीच्या मार्गाला नेतात. हे कळतसुद्धा नाही. आजचे चित्र फारसे वेगळे नाही. धुतल्या तांदळासारखे असल्याचा आव आणून समाजात बिनबोभाट वावरणारे कमी नाहीत. आचरण 'भ्रष्ट' असलेले समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसतील. अशा प्रवृत्तीमुळे मनुष्य स्वतःसह अनेकांना अधोगतीकडे नेतो. समाजातील व मानवातील दोष संतांनी कठोर शब्दात सांगून ठेवले आहे. इतकेच नव्हे तर स्वतःच्या विशुद्ध आचरण व निष्कलंक चारित्र्यातून आपल्यापुढे उत्तम आदर्श ठेवला.

तरीही समाजकारण, राजकारण, धर्मकारण, शिक्षण, उद्योग, व्यापार आदी जीवनाच्या बऱ्याच क्षेत्रात नैतिकतेचे अधःपतन उघड्या डोळ्यांनी पहावे लागत आहे. कारण संतांनी जो 'कर्मयोगातील' उच्चतम आचरण सिद्धांत सर्वांपर्यंत पोहचवला, तो आज फक्त सांगण्यापुरता शिल्लक उरल्याने आज ही स्थिती निर्माण झाली आहे. माणसातील या विकाराचे द्वाडापण संत ज्ञानदेव वेगळ्याच शैलीने वर्णितात.

**हे जळेवीण बुडवती । आगीवीण जाळीती**
**न बोलता कवळिती । प्राणियाते ।।**
**हे शस्त्रेवीण साधिती । दोरेवीण बांधिती**
**ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेउनि ।।**
**(ज्ञा.३/२५७-५८)**

विकार हे शरीराबरोबरच उत्पन्न झालेले असतात. वृत्तीच्या, ज्ञानाच्या पंक्तीला बसलेले असतात. ते एकदा का उसळले की, ते आपणाला पाण्यावाचून बुडवतात, अग्नीवाचून जाळतात. मानव प्राण्याला ते केव्हा कवेत घेतात तेसुद्धा कळत नाही. ज्ञानी लोकांचा घात करतात. 'कामासक्त'पणा मानवाला कुठे पोहोचवतो, सन्मार्गावर चालणाऱ्यास कसे चकवतो. हे स्पष्ट करून माउली पुढे म्हणतात, 'अशा 'कामज्वरी' व्यक्तींची भूक फार मोठी असते. सोबत इतर विकार असतात.काम, क्रोध, लोभ, तृष्णा, मोह मत्सर, अहंकार आणि दंभ या सर्वांनी जगभर धुमाकूळ घातला आहे. याचे प्रत्यंतर आज पावलो-पावली येत आहे.



विश्वामित्रांसारखे अनेक ज्ञानयोगी, तपस्वी भ्रष्ट झाल्याची उदा. पुराणात तर आहेच शिवाय वर्तमानातही असंख्य उदाहरणे दृष्टीस पडताहेत. तरीही आपण सावध होत नाही. विषयदरीत स्वतःला झोकून देतो. यातून सुटका नाहीच का? यावर उपाय काय? हे नैसर्गिक विकारातून आपण तरणार नाही का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे व विकारावर नियंत्रण कसे मिळवावे हे संतांनी आचार-विचारातून सांगून ठेवले आहे. विकारांचे आश्रयस्थान इंद्रिय आहेत. म्हणून इंद्रियांचे नियमन करता आले पाहिजे. विवेक-अविवेक हे जाणले पाहिजे. इंद्रियामागे धावणाऱ्या मनाला आवर घालून त्याला 'स्वधर्माकडे वळवावे. सदाचरणाची शिस्त मनाला लावावी. सत्संगी होऊन भले बुरे जाणावे. निग्रहपूर्वक विकारांचे दमन करावे. सद्गुरू चरणी रत असावे. अहंभाव टाकून द्यावा. अंतःकरणात सत्वगुणांची वृद्धी झाली की, पुण्यकर्माची इच्छा उत्पन्न होते. मग हे सर्व कसे प्राप्त होईल? यावर नाथांनी उत्तम मार्ग सांगितला आहे. ते म्हणतात,

**माझे (ईश्वर)भक्तीचे प्रेम प्रबळ ।**
**हे कर्म केवळ सात्त्विक ।।**
**माझे भजन हाचि स्वधर्म।**
**याचि नाव गा निजकर्म ।।**
**ऐसे ज्यासी कळे वर्म । सात्त्विक कर्म या नाव ।।** चांगुलपणावर विश्वास, ईश्वरावर श्रद्धा व उत्तम कर्माचा निर्धार नक्कीच विकारांना मारक ठरतील. संतांची वाणी पवित्र असते. सन्मार्ग दाखवते. संयम सहनशीलता शिकवते. चांगले-वाईट याची जाण निर्माण करते. संतवाणी आपल्यातील तामसीपणाला मारते. म्हणूनच ध्यानी, मनी, कानी व 'वाणी'त संतवाणी असावी हेच भगवंताकडे मागणे आहे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# अमृत भारत स्थानकांना आता नवसंजीवनी मिळणार : पंतप्रधान

## सोलापूर विभागातील ११ रेल्वे स्थानकांसह मध्य रेल्वेच्या ३८ रेल्वे स्थानकांची पायाभरणी

सुराज्य/सोलापूर

**भारतीय रेल्वेच्या इतिहासात ही नवीन पर्वाची सुरुवात आहे. देशातील जवळजवळ १३०० महत्त्वपूर्ण स्थानकांचा आता आधुनिकीकरणाच्या माध्यमातून पुनर्विकास केला जात असून या अमृत भारत स्थानकांना आता नवसंजीवनी मिळणार आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. एकूण १३०० स्थानकांपैकी अंदाजित २५००० कोटी रुपये खर्चाच्या ५०८ अमृत भारत स्थानकांची कोनशीला आज बसवण्यात आल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली. देशात रेल्वे तसंच सामान्य नागरिकांच्या बरोबरीनं होत असलेला हा पुनर्विकास प्रकल्प म्हणजे एक भव्य मोहीम असेल यावर त्यांनी भर दिला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून देशभरातल्या ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची कोनशीला बसवत एक ऐतिहासिक पाऊल उचलले. २४,४७० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या या पुनर्विकासात २७ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ५०८ स्थानकांचा समावेश आहे. यात इतर काही राज्यांसह उत्तर प्रदेश आणि राजस्थानातील प्रत्येकी ५५, बिहार मधील ४९, महाराष्ट्रातील ४४, पश्चिमबंगालमधील ३७, मध्यप्रदेशातील ३४, आसाममधील ३२, ओदिशातील २५, पंजाब २२, गुजरात आणि तेलंगणात प्रत्येकी २१, झारखंडमध्ये २०, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू प्रत्येकी १८, हरियाणा १५ आणि कर्नाटकातल्या १३ स्थानकांचा समावेश आहे. सोलापुरात खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रेय हिबारे, भाजपचे विक्रम देशमुख, रिपाइंचे राजाभाऊ सरवदे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, माजी नगरसेवक अमोल शिंदे उपस्थित होते.



देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात रेल्वेची भूमिका अधोरेखित करत, पंतप्रधान म्हणाले, की रेल्वेमध्ये सरकारने विक्रमी गुंतवणूक केली आहे. या वर्षी, अर्थसंकल्पात रेल्वेसाठी, २.५ लाख कोटींपेक्षा अधिक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

जी २०१४ च्या तुलनेत पांच पट अधिक आहे. आज रेल्वेच्या संपूर्ण विकासासाठी, सर्वंकष दृष्टिकोन ठेवून काम केले जात आहे, असे त्यांनी सांगितले.

### सोलापूर विभागातील १५ स्थानकांत विकास

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत, भारतीय रेल्वेची १३०९ स्थानके पुनर्विकासासाठी नियुक्त करण्यात आली आहेत. त्यात सोलापूर विभागातील १५ स्थानकांसह मध्य रेल्वेच्या ७६ स्थानकांचा समावेश आहे. सोलापूर विभागातील अहमदनगर, दौंड, कुर्डुवाडी, कोपरगाव, पंढरपूर, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, कलबुर्गी, शहाबाद, वाडी, जेऊर, बेलापूर, गंगापूर रोड आणि धुधनी स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. योजनेंतर्गत पुनर्विकासासाठी नामांकित केलेल्या मध्य रेल्वेसाठी, सन २०२३-२४ मध्ये सोलापूर विभागासाठी ३६३.५९ कोटी रुपयांसह १७२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, या योजनेंतर्गत टप्पा-१ मध्ये विविध कामे करणे अपेक्षित आहे.



## संभाजी भिडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची माढा काँग्रेसची मागणी

**टेंभुर्णी** : महात्मा गांधी व महात्मा जोतिबा फुले यांच्या सारख्या अस्मिता असणाऱ्या राष्ट्र पुरुषांवर टिका करून समाजात तेढ निर्माण करून राज्यातील जातीय सलोखा बिघडविणाऱ्या मनोहर कुलकर्णी ऊर्फ संभाजी भिडे या समाज कटकावर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी माढा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ऋषिकेश बोबडे व सर्व काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह टेंभूर्णी पोलीस ठाणे येथे बुधवारी निवेदन देण्यात आले. यावेळी दिपक खोचरे,भिमराव बडगर,विशाल पवार,संदीप मोरे,विठ्ठल मोरे,लक्ष्मण मोरे,बालाजी मोरे,फैयाज आतार,शंकर भरगंडे शिवाजी गायकवाड, मुकुंद ननवरे, विठ्ठल नवले,औदुंबर जाधव दत्ता कांबळे, बाळासाहेब लोंढे,अंकुश जगताप,अमित देशमुख,रोहित हवलदार,इम्रान बागवान,ज्योतिबा पोळ,श्रावण खरसुंडे,डॉ.सयाजी देशमुख,भास्कर सोनवणे,फिरोज तांबोळी,हरून शेख,मजर तांबोळी शुभम तोडकर, लक्ष्मीकांत मोरे,अनिल धोत्रे,सचिन जाधव,अक्षय डोईफोडे, ऋषिकेश चव्हाण,किरण देशमुख, प्रशांत भानुसे, सोमनाथ महाडिक (भिमानगर), अक्षय जगताप, राहुल धोत्रे, नाना बारावे, आनंद मोरे उपस्थित होते.

## शिक्षक संघटनेच्या कार्यातून सावंत यांची कायमस्वरुपी निवृत्ती

**सोलापूर** : गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक संघटनेवर काम करत होतो परंतु वैचारिक मतभेद झाल्यामुळे मी स्वतः स्व खुशीने या शिक्षक संघटनेतून कायमस्वरूपी बाहेर पडत असल्याचे संजय सावंत यांनी प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे. आबासाहेब किल्लेदार सांस्कृतिक भवन आसरा चौक सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा सोलापूर च्या वतीने त्रैवार्षिक अधिवेशनात राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष अंबादास वाजे यांनी माझी पुन्हा एकदा जिल्हा शिक्षक संघाच्या प्रवक्ते पदी निवड केली असे मला समजले असुन सोलापूर जिल्हयातील राज्य शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांशी वैचारीक मतभेदामुळे व घरगुती अडचणींमुळे राज्य शिक्षक संघाचे नेते संभाजीराव थोरात, अध्यक्ष अंबादास वाजे, राज्य शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष व माजी जिल्हाअध्यक्ष मच्छिंद्रनाथ मोरे व माजी सरचिटणीस बब्रुवाहन काशीद या सर्वांना माझ्या अंतर्मनाचा आवाज ऐकुन मी जबाबदारीने गांभीर्यपुर्वक शिक्षक संघटनेच्या कार्यातुन इतर कोणत्याही संघटनेत न जाता पुर्ण विचारांती कायम स्वरुपी निवृत्ती घेणार असल्याचे कळविले असताना देखील माझी पुन्हा केलेली निवड मला मान्य नसुन येथुन पुढे भविष्यात राज्य व जिल्हा शिक्षक संघाच्या कोणत्याही पदावर मी काम करण्यास इच्छुक नाही. असे पत्रकात म्हटले आहे.

## शेटफळ येथे कोयत्याने मारुन एक जखमी

**शेटफळ** : ता. मोहोळ येथे बोरिंगचे पाणी भरण्याच्या कारणावरून कोयता आणि सळईने केलेल्या मारहाणीत युवराज चंद्रकांत पवार (वय ३५ रा.शेटफळ) हा जखमी झाला. ही घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. त्यांना शेटफळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरेश गोरख पवार त्याची पत्नी पारू पवार आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## जाधववाडी येथे सव्वा लाखांची घरफोडी

**जाधववाडी** : ता. माळशिरस येथे राहणाऱ्या हनुमंत भागवत जाधव या वृध्द इसमाच्या बंद खोलीचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील १ लाख १८ हजार रुपये रोख आणि चांदीचे दागिने असा एकूण १ लाख २८ हजाराचे दागिने पळविले. ही चोरी शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. अशा आशयाची फिर्याद जाधव यांनी माळशिरस पोलिसात दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक मोहिते करीत आहेत.

## माजी उपमहापौर हारुन सय्यद यांचे निधन



**सोलापूर** : महानगरपालिकेचे माजी उपमहापौर हारून सय्यद यांचे निधन झाले आहे. अनेक दिवसांपासून हारून सय्यद हे विविध आजारांनी ग्रस्त होते.सोलापूर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.रविवारी सकाळपासून त्यांची प्रकृती खालावली होती.रविवारी सायंकाळी ५ च्या सुमारास उपचार सुरू असताना,राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली. नोकरीचा राजीनामा देत उपमहापौर झाले होते- हारून सय्यद यांनी सोलापूर महानगरपालिकेत चतुर्थ श्रेणी वर्गात अनेक वर्षे नोकरी केली होती. नंतर २०१२ साली नोकरीचा राजीनामा देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगरसेवक पदाची निवडणूक लढवली होती.मोठ्या मताधिक्याने निवडून आल्यामुळे राष्ट्रवादी पक्षाने उपमहापौर पदाची जबाबदारी दिली होती.

## कोथिंबिरीला सोलापुरात कवडीमोल भाव; शेतकऱ्यांनी रस्त्यावरच फेकून दिली

सुराज्य/सोलापूर

एकीकडे भाज्यांपाठोपाठ धान्यांचे भाव गगनाला भिडले असताना शेतकऱ्यांनी आर्थिक गणित घालून मोठ्या कष्टाने पिकविलेल्या कोथिंबिरीचा भाव पार कोसळल्यामुळे शेतकऱ्यांचा पुरता हिरमोड झाला आहे. दूर अंतरावरून वाहतूक खर्च करून आणलेल्या कोथिंबिरीला सोलापुरात कवडीमोल भाव मिळाल्यामुळे आणि व्यापारी खरेदी करायलाही तयार नसल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी कोथिंबीर चक्क रस्त्यावरच फेकून दिली. फेकून दिलेली कोथिंबीर आसपासच्या मंडळींनी जनावरांना चारण्यासाठी आणि किरकोळ बाजारात विकण्यासाठी उचलून नेल्याचा प्रकार घडला.




सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये कोथिंबीर विकण्यासाठी बीड जिल्ह्यातून दीपक गहिनीनाथ ढाक व अन्य दोन शेतकऱ्यांनी दोनशे कॅरेट कोथिंबीर आणली होती. परंतु प्रतिकॅरेट अवघा दहा रूपये मिळाला. या कवडीमोल भावाने जवळपास ४०-५० कॅरेट कोथिंबीर कशीबशी विकण्यात आली. उर्वरीत १६० कॅरेट कोथिंबीर खरेदी करायला व्यापारी तयार नव्हते. तेव्हा शेतकरी अक्षरशः हतबल झाले. किमान लागवडीचा खर्च तर सोडाच, पण वाहतुकीचाही खर्च निघत नाही. उलट पदरचे पैसे देण्याची वेळ आल्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी वाहनातून कोथिंबीर उतरविलीही नाही. तर संपूर्ण कोथिंबीर तेथेच रस्त्यावर फेकून दिली. तेव्हा ही कोथिंबीर आसपासच्या झोपडपट्ट्यांसह अन्य भागातील नागरिकांनी फुकटात उचलून नेली. गणेश सरवदे याने बैलगाडी आणून रस्त्यावरील कोथिंबिरीचा ढीग उचलून नेला. आपण घरातील गायी- म्हशी आणि बकऱ्यांना खायला घालण्यासाठी कोथिंबीर फुकटात नेत असल्याचे त्याने सांगितले.

## पडसाळी येथे वृद्ध शेतकऱ्याला मारहाण

सुराज्य/सोलापूर

शेतातील बांधाच्या कारणावरून एका ६५ वर्षीय इसमाला तिघांनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील पडसाळी येथे शनिवारी दुपारी घडली .मकबूल इब्राहिम शेख ( वय ६५ रा. पडसाळी) असे जखमीचे नाव आहे . त्यांना आज शेतामध्ये तानाजी शिरसट ,बंटी शिरसट ,नेताजी शिरसट यांनी मारहाण केली . त्यांना वडाळा येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात आज सायंकाळी दाखल करण्यात आले .



## प्रभाग २२ मध्ये काँक्रिटीकरण रस्त्याचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

माजी नरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते किसन जाधव, नागेश गायकवाड यांच्या देखभाल दुरुस्ती फंडातून प्रभाग २२ मधील २२ सुशील मराठी प्रशाला (भैरू वस्ती) समोरील मेन रोड चे काम करण्यात आले या काँक्रिटीकरण रस्त्याचे उद्घाटन राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, सचिन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी रोहित भोसले, राहूल जाधव, माणिक कांबळे, वसत कांबळे व प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## शावळ येथे दोन गटात हाणामारी; दोन महिलांसह चौघे जखमी

सुराज्य/सोलापूर

शेतातील बांधाच्या वादातून दोन गटात काठी, दगड आणि लाथाबुक्क्याने झालेल्या मारहाणीत दोन महिलासह चौघेजण जखमी झाले . ही घटना शावळ (ता.अक्कलकोट) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. सर्व जखमींना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले .

पूजा गुरुनाथ हडपद (वय २२) आणि बसवराज श्रीशैल हडपद (वय ३२ दोघे रा. शावळ) असे पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. त्यांना बांधाच्या वादातून श्रीमंत धर्मण्णा गजा आणि इतर दोघांनी काठी आणि दगडाने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील सरस्वती श्रीमंत गजा (वय ४५ ) आणि समर्थ श्रीमंत गजा (वय २२ दोघे रा.करजगी ता.अक्कलकोट) हे जखमी झाले. त्यांना त्याच कारणावरून पूजा हडपद, धोना बसवराज हडपद आणि अन्य एकाने मिळून काठी आणि दगडाने मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## सैनिकांचे प्रलंबित सर्व प्रश्न मार्गी लावणार : जाधव

सुराज्य/लक्ष्मी दहिवडी

मंगळवेढा तालुक्यातील सर्व आजी व माजी सैनिकांच्या उपस्थितीमध्ये महसूल सप्ताहाचे औचित्य साधून एक श्याम शहीदों के नाम हा कार्यक्रम मंगळवेढा येथील तहसील कार्यालयाच्या आवारात आयोजित केला होता या कार्यक्रम प्रसंगी तालुक्यातील अनेक माजी सैनिकांनी प्रशासन हे सैनिकांना नीट वागणूक देत नाही आम्ही सीमेवर रक्षण करून आलो असतानाही आमच्या स्वतःच्या प्रश्नांसाठी येथे येरझारा घालाव्या लागतात अशी कैफियत अनेक माजी सैनिकांनी तहसीलदार मदन जाधव यांचा समोर मांडली . शनिवारी सायंकाळी पाच वाजता आयोजित कार्यक्रमात अनेक माजी सैनिकांनी आपल्या व्यथा मांडल्या.



या सैनिकांच्या प्रश्नांना उत्तर देताना तहसीलदार मदन जाधव यांनी त्यांच्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना केल्या की येत्या सोमवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत कोणत्याही सैनिकाचा एकही अर्ज आपल्या टेबलवर प्रलंबित राहता कामा नये. प्रत्येक अर्जावर निर्णय घ्या आपल्या खात्याशी निगडित अर्ज नसेल तर संबंधित विभागाला अर्ज पाठवून उत्तर मागून घ्या मात्र इथून पुढे एकाही सैनिकाच्या अर्जाला दिरंगाई होता कामा नये त्याही कर्मचाऱ्याकडून जाणून-बुजून एखाद्या सैनिकाचा अर्ज प्रलंबित राहत असेल तर थेट माझ्याशी संपर्क करा, असेही तहसीलदार जाधव यांनी यावेळी बोलताना सांगितले.

याप्रसंगी माजी सैनिक संघटनेचे सल्लागार बबन रोकडे, मंगळवेढा अध्यक्ष मल्लय्या स्वामी, भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष गोपीनाथ माळी, बाबासाहेब पवार, चंगेचखान इनामदार, आबा लेंडवे, शहिद मेजर सुधीर घाडगे यांच्या मातोश्री बाई धर्मराज घाडगे आदीजन उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय माने यांनी केले तर एक शाम शहीदोके नाम मध्ये अजित ससाणे, मारुती प्रक्षाळे यांनी देशभक्ती पर गीत गायिले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तहसील कार्यालयाचे अव्वल लिपिक उमाकांत मोरे, नितीन माळी, साईनाथ आनंदेलवार, शिवाजी भोसले, अलिफ सुतार, कोळी आदींनी परिश्रम घेतले.याप्रसंगी मंडलाधिकारी,तलाठी महसूल कर्मचारी उपस्थित होते.

## अर्जुनसोंड येथे पत्नीस मारहाण

सुराज्य/सोलापूर

राहत्या घरात नवऱ्याने पत्नीला बेदम मारहाण केल्याची घटना अर्जुनसोंड (ता मोहोळ) येथे शुक्रवारी घडली . सुजाता शिवशाही आवळे (वय २५ ) असे जखमीचे नाव आहे .शुक्रवारी सकाळी राहत्या घरात त्यांना पतीने मारहाण केली . यात डोळ्याला, पोट आणि सर्वांगाला मार लागल्याने त्यांना मोहोळ येथे प्रथम उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात शनिवारी दाखल करण्यात आले .

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गुरमे बनले दुसऱ्यांदा आयर्नमॅन

### सलग दुसऱ्या वर्षी ट्रायथलॉन पूर्ण असा विक्रम नोंदविणारे ठरले देशातील पहिलेच वरिष्ठ निरीक्षक

सुराज्य/सोलापूर

**छत्रपती संभाजीनगर पोलिस दलाच्या गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप गुरमे यांनी शनिवार, दि. ५ ऑगस्ट रोजी युरोपमधील इस्टोनियामध्ये झालेली ट्रायथलॉन स्पर्धा सलग दुसऱ्यांदा यशस्वीपणे पूर्ण करीत आयर्नमॅन' हा बहुमान मिळविला. त्यांनी गतवर्षीच ही स्पर्धा पूर्ण केली होती. त्यापेक्षा विक्रमी वेळेत त्यांनी यंदा हे यश मिळविले. असा विक्रम नोंदविणारे ते भारतातील पहिलेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक ठरले आहेत. जगभरातील अत्यंत कठिण स्पर्धेमध्ये या स्पर्धेचा समावेश आहे. अॅथलेटच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा कस पाहणारी ही स्पर्धा फार कमी स्पर्धक पूर्ण करू शकतात. मागील अनेक वर्षांपासून या स्पर्धेची तयारी करणाऱ्या संदीप पांडुरंगराव गुरमे यांनी कठोर मेहनतीने हे यश मिळविले.**




युरोपमधील इस्टोनियाची राजधानी टॅलिन येथे ही स्पर्धा पार पडली. ३.८ किलोमीटर समुद्रात पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.५ किलोमीटर धावणे हे तीनही क्रीडाप्रकार, साधारण १७ ते १८ अंश सेल्सियस तापमानात एकसलग पूर्ण करावे लागणारी ही स्पर्धा जगातील कठिणतम ट्रायथलॉन स्पर्धांपैकी एक समजली जाते. ही स्पर्धा जिंकणे हे तर महाकौशल्याचे काम आहे पण ती पूर्ण करणारे स्पर्धकही खूप कमी असतात.

व. पो. नि.संदीप गुरमे हे औरंगाबाद येथील गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत असून एक सक्षम पोलिस अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे. ते एकेकाळचे गुणवत्ताप्राप्त एनसीसी कॅडेट होते. अॅथलेटिक्सची त्यांची आवड त्यांनी बालपणापासून जपलेली आहे. निर्व्यसनी व संपूर्ण शाकाहारी व्यक्तिमत्त्व असलेल्या श्री. संदीप गुरमे यांनी विरळ ऑक्सिजन असलेल्या मनाली ४००० फूट उंची ते लेह लडाख खारदूगला १८००० फूट उंचीवर ५५० किमी सायकलिंग २०१९ मध्ये करण्याचा विक्रम नोंदविला आहे.'आयर्नमॅन' स्पर्धे साठी त्यांनी मागील तीन वर्षांपासून तयारी चालविली होती. वाळूज औद्योगिक वसाहतीतील उद्योजक अभिजित नारगोलकर हे गुरमे यांचे कोच' आहेत. या स्पर्धेसाठीची शारीरिक व मानसिक तयारी नारगोलकर यांनी करून घेतली. गतवर्षी त्यांनी प्रथम ही स्पर्धा पूर्ण केली आणि या वर्षी त्यांनी गतवर्षीचा आपलाच विक्रम मोडला.हवाई बेटांवरील रहिवासी असलेल्या ज्युडी आणि जॉन कोलिन्स यांनी १९७४ मध्ये सॅन दिएगो येथे झालेल्या ट्रायथलॉन स्पर्धेत भाग घेतला होता. त्यावरून प्रेरणा घेत त्यांनी १९७७ मध्ये सायकलिंग-रनिंग-स्विमिंग' हे तीनही क्रीडाप्रकार एकत्र असलेल्या स्पर्धेचे प्रथम आयोजन केले. कुठल्याही अॅथलिटसाठी स्वप्नवत असलेली, त्यांच्या क्षमतांचा कस लागणारी ही स्पर्धा अल्पावधीतच लोकप्रिय ठरली. कुठलीही गोष्ट शक्य आहे' असे ध्येयवाक्य असलेली ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण करणार्या स्पर्धकाला आयर्नमॅन' म्हणून गौरवले जाते. दरवर्षी जगभरातून हजारो स्पर्धक यात सहभागी होतात आणि फार कमी ही स्पर्धा पूर्ण करू शकतात.अशा प्रकारे दोन वेळा आयर्नमॅन बनण्याचे यश संपादन करणारे देशातील पहिले वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठरले आहेत.वयाच्या ५२ व्या वर्षी आर्यमॅन ही स्पर्धा दुसऱ्यांदा यशस्वीरित्या पार पाडली आहे.

अशी ही कठिण स्पर्धा पूर्ण करणाऱ्या संदीप गुरमे यांचे पोलिस आयुक्त - औरंगाबाद शहर मनोज लोहिया (भापोसे), संदीप यांचे आई-वडील, पत्नी सौ. रजनी, मुलगा सरल व चिराग, त्यांचे नातेवाईक त्यांचे मित्रमंडळ, उद्योजक व पोलिस विभागाकडून तसेच उद्योजक तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार व नागरिक यांचे कडून अभिनंदन होत आहे.

# ‘संघ धार्जिण्या’ भूमिकेने दूध उत्पादकांचे शोषण : अॅड. करे

## पशुखाद्य दरात २५ टक्के कमी होण्याऐवजी ४० रूपयांनी वाढ

✔ सुराज्य/सोलापूर

**पशुखाद्याच्या दरामध्ये पुन्हा एकदा वाढ झाली असून शासनाने महिन्यापूर्वी स्थापन केलेल्या पशुखाद्य दर नियंत्रण समितीने काय काम केला? सध्या राज्यामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती असून चाऱ्याची टंचाई व चाऱ्याच वाढलेले दर, याचबरोबर दुधाचे घटले दर ,यांचा सामना शेतकरी करत असताना पुन्हा एकदा पशुखाद्याच्या किमतीमध्ये वाढ झाली असून पशुखाद्य नियंत्रण समिती व दुग्ध विकास मंत्र्यांच्या दुध संघ धार्जिण्या भुमिकेमुळे दुध उत्पादकांचे शोषण सुरू असल्याचा गंभीर आरोप दूध उत्पादक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक अँड. श्रीकांत करे यांनी केला आहे.**

मागील महिन्यापुर्वी सरकारने शेतकऱ्यांच्या गायींच्या दुधाला प्रतिलिटर ३४ दर निश्चित केला. तर पशुखाद्याचे दर ही २५ टक्के कमी करण्यासाठी नियंत्रण समिती ची स्थापना केली.

परंतु दुध संघांनी चलाखीने पुर्वी असणाऱ्या ३० पैसे 'रिव्हर्स'चा दर १ रूपया करून शेतकऱ्यांच्या हातात ३० ते ३१ रूपये मिळतील अशी व्यवस्था केली तर पशुखाद्याच्या सध्या असणाऱ्या दरात २५ टक्के कपात करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी पशुखाद्य कंपन्यांनी ४० रूपये वाढ केली आहे.त्यामुळे शासनाने नियुक्त केलेल्या दर निश्चिती व खाद्य नियंत्रण समितींच्या कारभारावरच शंका उपस्थित केली जात आहे.

### केवळ भांडवलदारांच्या हिताचे संवर्धन करणारी समिती



सरकारने मिल्को मिटर तातडीने चेक करून सदोष मिल्को मिटरवर कारवाई केली पाहिजे , सदोष वजन काट्यावर कारवाई केली पाहिजे, जे कोणी अशा रितीने गुन्हा करत असतील त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. दूध दर समिती व पशुखाद्य नियंत्रण समितीसाठी निवडलेल्या सदस्यांमुळेच व दूध मंत्र्यांच्या लवचिक भूमिकेमुळे दूध उत्पादकाचे शोषण सुरू झाले आहे.याचबरोबर दुधाचा उत्पादन खर्च काढण्यासाठी पुन्हा एकदा कृषी विद्यापीठ व तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती गठित करून दुधाचा उत्पादन खर्च काढायला हवा यावर दुग्धविकास मंत्री बोलत नाही हे दुर्दैव आहे. दुधाचे दर ठरवण्यासाठी जी समिती नियुक्त केली आहे त्यामध्ये शेतकरी प्रतिनिधी यांना स्थान दिले नाही केवळ भांडवलदारांच्या हिताचे संवर्धन करणारी समिती स्थापन केलेली आहे.दूधसंघाला अनुदान देण्यापेक्षा जर सरकारला अनुदान द्यायचं झालं तर ते थेट शेतकऱ्याला द्यावे .याचबरोबर २०१९ साली निलंगेकर समितीने एक अहवाल सादर केला त्यामध्ये गायीच्या दुधाचा उत्पादन खर्च ३९.५२ रुपये व म्हशीचा ६१.२% रुपये दाखवलेला आहे ,सरकारला जर खरेच शेतकऱ्यांची कळकळ असेल तर त्या समितीच्या शिफारशीची अंमलबजावणी करावी.

**– अॅड. श्रीकांत करे,**
राज्य समन्वयकदूध उत्पादक संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य



## आधुनिक शिक्षण काळाची गरज : मौलाना इब्राहिम

✔ **सोलापूर** : आजच्या काळात प्रत्येक क्षेत्रातील आधुनिक शिक्षण घेणे ही काळाची गरज बनली आहे, संगणक व इंटरनेटचा उपयोग करताना काळजीपूर्वक करावा त्याचे दुषपरिणाम थोडे असले तरी पण फायदे अधिक आहेत. संगणक शिक्षण आपणास जगाच्या आधुनिक शिक्षणाकडे समावून घेतो म्हणून आज हे शिक्षण आपण आपल्या पाल्याना जरूर शिकवावे, असे आवाहन जमियत उल्मा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना इबराहीम कासमी यांनी गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी नूर एज्युकेशन ट्रस्ट संचलित नूर कॉम्युटर सेंटरच्या उद्घाटनाप्रसंगी केले.

संस्थेचे अध्यक्ष नजीर मुन्शीनी आपल्यासाठी ही शिक्षणाची संधी गरीब व होतकरू पाल्यांसाठी करून दिल्यामुळे त्यांचे विशेष कौतुक ही केले. प्रथम नजीर मुन्शींनी उपस्थितांचे स्वागत करत संस्थे विषयी माहिती विषद केली. सचिव इकबाल अन्सारी यांनी प्रमुख पाहुण्याचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

डॉ. शफी चोबदार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत म्हणाले, आयुष्यात वेळेला फार महत्व आहे. आपला हे अमुल्य वेळ शिक्षण घेण्यासाठी वापरावा कारण वयानुसार काळ बदलत जातो, शिक्षण बदलत जाते आज आम्ही आधुनिक शिक्षणाकडे जास्त लक्ष केंद्रीत केले तरच आपला अस्त्विव आपण टिकवू शकतो. सुत्रसंचलन महेमुद नवाज यांनी तर आभार इकबाल अन्सारी यांनी मानले.यावेळी डॉ. जैनोद्दीन पटेल, मौलाना हाफीज सज्जाद शेख, उर्दूचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शफी चोबदार, खादिमाने उर्दूचे सहसचिव महेमूद नवाज, इंजिनियर कुद्दूस बागबान, महाराष्ट्र उर्दू शाळचे जुबेर हिप्परगी, उर्दू अदबी कॉन्फरन्सचे शफी कॅप्टन, अकील मुन्शी, अब्दूल रहमान, इक्बाल बागबान, शमा शिक्षण मंडळचे अय्युब नल्लामंदू आदि उपस्थित होते.



## मैंदर्गी अंगणवाडीतर्फे स्तनपान सप्ताह साजरा

✔ **अक्कलकोट** : प्राथमिक आरोग्य केंद्र व मैंदर्गी अंगणवाडी क्रमांक १,२,३,यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. गरोदर माता, स्तनदा माता, यांना स्तनपानाचे महत्व, वैयक्तिक स्वच्छता, बाळाची काळजी, गरोदरपणात, व नंतर घ्यावयाची काळजी तसेच आईचे दुध हे बाळास बौध्दिक, मानसिक, शारिरींक, व भावनिकदृष्ट्या किती महत्वाचे आहे, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. तर स्तनपान विषयी मार्गदर्शन डॉ.सुरेखा बिराजदार व अलका विभूते आधिपरीचारीका व निर्मळे अंगणवाडी मुख्य सेविका यांनी केले. या सप्ताहात मुख्यत्वे अंताक्षरी खुणे , प्र.शा.तंत्रद्न सर्व गरोदर मातांची रक्त तपासणी केले. कार्यक्रमास सर्व माता भगिनी, अंगणवाडी सेविका नागम्मा भुरकी, मुजावर, सावित्री ईक्कळकी,मदतनीस शावरी, टोणगे उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका साचे यांनी केले तर आभार ईक्कळकी यांनी मानले.



## बाळे येथे विविध शासकीय योजनांचा महामेळावा

✔ सुराज्य/सोलापूर

प्रभाग क्रमांक पाच यांच्या वतीने प्रभागातील नागरिकासाठी विविध शासकीय योजनांचा महा मेळावा खडक गल्ली बाळे येथे आयोजित करण्यात आला होता. मेळावा शुभारंभ आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी राजा आलुरे, आनंद भवर विनय ढेपे शिवलिंग शिवपुरे नाना शिंदे शिरीष सुरवसे अमोल झाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमात बाळे परिसारातील असंख्य नागरीकांनीं स्वानिधी योजाना बालसंगोपण योजना व नवीन मतदार नोंदणी यांचा लाभ घेतला.

कार्यक्रमासाठी सुहास माने, रतन क्षिरसागर, नागेश गजभार, गणेश काळे, प्रदीप माळी, पवन आलुरे विकास माने प्रविण गावडे नंदु बटाणे हेंमत गुरव, अजय बामणकर, अजय वायदंडे, कुशल बमडगर, बलवान भवर, विनित गुमटे, नितिन सर्वगोड, अंजय पंडीत गुमटे सचिन कबाडे नागेश गजबाटे पदाअधिकारी कार्यकर्ते यांनी परीश्रम घेतले.

## रागाने का बघतो म्हणत तरुणाला मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

आमच्याकडे रागाने का बघतो म्हणत तरुणाला तीन जणांनी मिळून मारहाण केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत राजेश मल्लेश यादव (वय-३०,रा.विजापूर नाका) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अरूण आठवले, अक्षय अरूण आठवले, अजय अरूण आठवले (सर्व रा.झोपडपट्टी क्रमांक १,विजापूर नाका) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास जाधव करत आहेत.

## इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंड-३ ऑप्शन्स भरण्याची उद्यापासून प्रकिया

✔ सुराज्य/पंढरपूर

'शै.वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशाच्या पहिल्या व दुसऱ्या फेरीचा विचार केला असता नेहमीप्रमाणे या ही वर्षी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

विद्यार्थी व पालकांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड होणाऱ्या विद्यार्थांची वाढती संख्या, शैक्षणिक व संशोधनाचे वातावरण, मिळालेली मानांकने, उपलब्ध सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या गोष्टींचा प्रामुख्याने विचार केलेला दिसत आहे. एकूणच 'स्वेरीत प्रवेश मिळणे ही काळाची गरज असल्याचे पालकांनी व विद्यार्थ्यांनी पूर्णपणे ओळखले आहे हेच दिसून येते.' असे प्रतिपादन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले.

'शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशाची तिसरी फेरी (थर्ड कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची प्रक्रिया येत्या मंगळवार, दि.८ पासून ते गुरुवार, दि.१० ऑगस्ट हे तीन दिवस चालणार आहे.

या तिसऱ्या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी अधिकृत संकेतस्थळावर शनिवार, दि. १२ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार आहे. ज्यांना पहिल्या व दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळाला नाही व ज्यांनी पहिल्या फेरीत व दुसऱ्या फेरीत नॉट फ्रीझ/ बेटरमेन्ट केले आहे त्यांना या तिसऱ्या व अंतिम फेरीचा लाभ घेता येणार आहे.' अशी माहीती अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी दिली.

सन २०२३-२४च्या पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्चित करणे आदी प्रक्रियानंतर पहिल्या व दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तिसऱ्या प्रवेश फेरीचे जागावाटप (अलॉटमेंट) शनिवार, दि.१२ ऑगस्ट रोजी प्रदर्शित केले जाणार आहे.

## संभाजी आरमारची श्रीकांत करंडक स्पर्धा

✔ सुराज्य/सोलापूर

संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या वाढदिवसानित्त शब्दश्री प्रतिष्ठानच्या वतीने श्रीकांत करंडक स्पर्धा भरवली जाणार आहे. बुधवारी १६ ऑगस्ट रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दुपारी ३ ते ७ यावेळेत ही स्पर्धा होणार आहे. यामध्ये जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेतली जाणार आहे. ही स्पार्धा सर्वांसाठी खुली आहे. सोलापूरच्या तरूणाईच्या स्थलांतरण कारणे आणि उपाय, सोलापूर काल आज आणि उद्या, मी लोकशाही रडताना पाहिली, आत्मनिर्भर भारत स्वप्न आणि सत्य हे स्पर्धेचे विषय आहेत. यासाठी प्रथम ४०२१ रूपये, व्दितीय ३०२१ रूपये, तृतीय २०२१, आणि उत्तेजनार्थ १०२१ रोख बक्षीस आणि स्मृतीचिन्ह दिले जाणार आहे. सहभागी होण्यासाठी मनिष काळे यांच्या ७०२८९९७७९६ मोबाईल नंबर संपर्क साधण्याचे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे, कार्यअध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांनी केले आहे.



## 'ग्लेनमार्क' तर्फे होणार ६०० सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिनचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

ग्लेनमार्क लाइफ सायन्स कंपनीचे अधिकारी जॉन सालवे आणि एस आर बेलदार यांनी त्यांच्या कंपनीतून सीएसआर फंडातून सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ६०० मशीन देण्याचे घोषित केले. त्यांनी त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून केलेल्या अनेक सामाजिक उपक्रमाबद्दल माहिती दिली.

ग्लेनमार्क लाइफ साईन्स या संस्थेतर्फे नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाईंड लातूर शाखा, डॉ. मेतन फाऊंडेशन व रोटरी क्लब लातूर होरायझेन याच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महात्मा फुले आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद शंभरकर, सोलापूर जिल्हा परिषदचे मुख्याधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या उपस्थितीत खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते सोलापुरातील शाळेला, कॉलेजला, वसतिगृहांना ९० सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिन मोफत देण्यात आले. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.

डॉ. मेतन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश मेतन यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. डॉ. व्यंकटेश मेतन यांनी उपक्रमासाठी शाळा, कॉलेज यांची निवड कशी केली व या कार्यक्रमाचे नियोजन याबद्दल माहिती दिली. नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड, शाखा लातूरचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार राठी यांनी या प्रकल्पाची विस्तृत माहिती दिली. त्यांनी या मशीनचा उपयोग कसा करायचा याचे प्रात्यक्षिक दिले. या कार्यक्रमात मागील साडेतीन वर्षात सोलापूर जिल्ह्यात केलेल्या कामाबद्दल मिलिंद शंभरकर यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्हाधिकारी यांनी कुमार आशीर्वाद यांनी मुलींसाठी अत्यंत महत्त्वाचा व काळाची गरज ओळखून हा उपक्रम राबवत असल्याबद्दल कौतुक केले. नजीकच्या काळात असे उपक्रम राबवण्यासाठी मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. मनीषा आव्हाळे यांनी नजीकच्या काळात जिल्हा परिषदेतील शाळेसाठीसुद्धा असे उपक्रम राबविले जातील असे सांगितले.

मिलिंद शंभरकर यांनी मोफत मिळालेल्या या मशीनची योग्य ती निगा राखण्यासाठी आवाहन केले.

खासदार डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांनी स्त्री शक्तीचे महत्त्व सांगून त्यांचे आरोग्य निरोगी कसे राहील याकडे लक्ष केंद्रित करावे असे सांगितले. आशिष बाहेती यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमासाठी सोलापूर शहरातील ४५० हुन जास्त संख्येने शिक्षक व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमास अभय दिवाणजी, प्रल्हाद कांबळे, सोमेश्वर लवंगे, सिद्धाराम सक्करगी, चिदानंद मुस्तारे, महेश बनसोडे, श्रीनिवास मेतन, वीणा मेतन, राघवेंद्र मेतन, लातूरहून विश्वनाथ विभुते, डॉ. भराडिया, नीलकंठ स्वामी, बिरादार, पांडे, डॉ. हुलसुरे, सूर्यवंशी, दर्डा,उपस्थित होते.

## पिराचीकुरोली येथे मोटारीच्या धडकेने पादचारी ठार

✔ **सोलापूर** : पिराची कुरोली (ता. पंढरपूर) येथील चिंचणी पाटीजवळ वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने रस्ता ओलांडणारे दत्तात्रय मारुती गायकवाड (वय ५५ रा. पिराची कुरोली) हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात शनिवारी दुपारच्या सुमारास घडला .

दत्तात्रय गायकवाड हे खडीक्रेशर जवळ गवंडी काम करत होते. लघुशंकेसाठी ते रस्ता ओलांडत होते. त्यावेळी एमएच१४- जीएस-७४५८ या क्रमांकाची मोटार धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. या अपघाताची नोंद पंढरपूर ग्रामिण पोलिसात झाली. पोलिसांनी मोटारीचा चालक अनिल दगडू दाते (रा. हवेली जि.पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक करचे पुढील तपास करीत आहेत .

## नो कोशायारी नो व्होट निर्णय घेणार ; पेन्शनवाढीसाठी ठोकळे यांचा इशारा

✔ सुराज्य/मोहोळ

महाराष्ट्रातील ईपीएस १९९५ योजनेतील पेन्शनधारकांना भगतसिंग कोशारी समितीच्या अहवालानुसार डिसेंबर २०२३ पर्यंत पेन्शन देण्याबाबत निर्णय न घेतल्यास नो कोशायारी नो व्होट असा निर्णय घेण्याचा इशारा महाराष्ट्र राज्याचे संघटनेचे सचिव शशिकांत ठोकळे यांनी दिला आहे.

महाराष्ट्रातील बारा लाख इपीएस १९९५ योजनेतील पेशंट धारकांना अत्यंत तुटपुंजी पेन्शन मिळत आहे २०१४ पासून प्रधानमंत्री यांना भगतसिंग कोशीयारी समिती अहवाल नुसार, १४७नुसार दरमहा रुपये ९००० व त्यावर महागाई भत्ता लागू करावा मोफत वैद्यकीय सेवा सुविधा द्यावी विधवांना शंभर टक्के पेन्शन मिळावी यासाठी दिल्ली मुंबई नागपूर या ठिकाणी व जिल्हास्तरावर पेन्शन कार्यालयात जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सुध्दा अद्याप पेन्शन वाढ मिळालीच नाही.

त्यामुळे ९ ऑगस्ट २०२३ रोजी क्रांती दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत भगतसिंग कोशियारी यांच्या शिफारशीनुसार पेन्शन वाढ द्यावी डिसेंबर २०२३ पूर्वी पेन्शन वाढीचा निर्णय न घेतल्यास येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील बारा लाख पेन्शनधारक व ४.५ कोटी कार्यरत असणारे कर्मचारी केंद्र सरकारच्या विरोधात मतदान करण्याचा निर्णय घेतील असा इशारा राष्ट्रीय कार्यकारिणीचे भोपाळ येथील मध्यवर्ती कार्यकारणीच्या मीटिंगमध्ये घेण्यात आला आहे या बाबतचे निवेदन महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी यांचे शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार आहे.

नो कोशारी नो व्होट असा संघटनेचा नारा असणार आहे अशा आशयाचे निवेदन राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मार्गदर्शनाखाली देण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्याचे संघटक सचिव इंजिनिअर शशिकांत ठोकळे यांनी दिले आहे हा निर्णय घेते वेळेस राज्याध्यक्ष विनायक गोडसे कार्याध्यक्ष अनिल ताराबादकर उपाध्यक्ष रमेश ठाकूर हे उपस्थित असल्याचेही ठोकळे यांनी यावेळेस पसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## मिरवणुकीत लहान मुलींचे व्हिडीओ शुटींग करून अश्लील हावभाव

### बार्शीतील दोघांवर विनयभंग, पोक्सो, अॅट्रॉसिटी व खंडणीचा गुन्हा

✔ सुराज्य/बार्शी

मिरवणूकीत सहभागी महिलेचा विनयभंग तसेच लहान मुलींचे व्हिडीओ शुटींग करून अश्लील हावभाव व वर्तन करून तसेच जातीवाचक उल्लेखाने अपमानित करून व सदरचे व्हिडीओ शुटींग व्हायरल करण्याची धमकी देवून ५० हजार रूपयांची मागणी केल्याप्रकरणी तिघांवर बार्शी शहर पोलीसांत विनयभंग, पोक्सो, अॅट्रॉसिटी, खंडणी, अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. राज नानावटी, दिनानाथ काटकर (दोघे रा. बार्शी )अशी गुन्हा दाखल झालेल्या दोन संशयितांची नावे आहेत. तिसऱ्या व्यक्तीचे नांव अदयाप निष्पन्न झालेले नाही. पीडीत महिलेने याबाबत फिर्याद दिली आहे.

दि. २ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमीत्त शहरातून मिरवणूक निघाली होती. या मिरवणूकित सुमारे दीड ते दोन हजार समाजबांधव सहभागी झाले होते. यात महिला व मुली गाण्यावर डान्स करून आनंद साजरा करत होत्या. यावेळी संशयित तेथे येवून फिर्यादीचा विनयभंग केला. मोबाईलमध्ये व्हिडीओ शुटींग करू लागला. लहान मुलींचा डान्स करतानाचे व्हिडीओ शुटींग केले. संशयित तिथे हे मिरवणूकितील मुलींकडे व महिलांकडे पाहून अश्लील हावभाव करत होते. फिर्यादीने इतर महिलांसह तिच्याशी केलेल्या अश्लील वर्तनाबद्दल तसेच शुटींग का काढता असे त्यांना विचारले असता त्यांनी पीडीतेस जातीवाचक बोलून अपमानित केले. यावेळी मिरवणूकितील लोक आजूबाजूला जमू लागल्याने ते निघून गेले.

त्यानंतर, दि. ५ रोजी सायंकाळी मिरवणूकिबाबत समाजबांधव चर्चा करत असताना मिरवणूकिमध्ये घडलेला प्रकार फिर्यादीने समाजबांधवांना सांगितला. त्यावेळी मिरवणूकिचे अध्यक्ष गोविंद शेंडगे व सौरभ कांबळे यांनी देखील मिरवणूकिदिवशी रात्री आम्हाला राज नानावटी याने तुम्ही मिरवणूकिसाठी खूप पैसे गोळा केले आहेत. तुमच्या मिरवणूकितील महिलांचे व मुलींचे नाचतानाचे व्हिडीओ माझेकडे व दिनानाथ काटकर यांचेकडे आहेत. तुम्ही आम्हाला ५० हजार रूपये दया, नाहीतर तुमच्या मिरवणूकितील मुलींचे काढलेले व्हिडीओ शुटींग सगळीकडे व्हायरल करू अशी धमकी दिली असे सांगितले अशा आशयाची फिर्याद दिली आहे. अधिक तपास डीवायएसपी जालिंदर नालकुल करत आहेत.


दरम्यान, दि. ५ रोजी सायंकाळी राज नानावटी व दिनानाथ काटकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली. यावेळी महिला व समाजबांधव मोठया संख्येने जमले होते. गुन्हा दाखल करून संशयितांना अटक करावी या मागणीस्तव समाजबांधवांनी पोलीस ठाण्याच्या आवारात ठिय्या मारला तसेच घोषणाबाजी केली. रात्री उशीरापर्यंत समाजबांधव पोलीस ठाण्याच्या आवारात होते.

# पंढरपूर-फलटण रेल्वे मार्गाचे काम डिसेंबरमध्ये सुरू होईल : खा. निंबाळकर

## मुंबई-हैदराबाद बुलेट ट्रेनसाठी प्रयत्नशील

सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडीत रेल्वेचे नव्याने स्टेशन सुरू होणार असल्याने शहराचा कायापालट होणार आहे. कुर्डूवाडी रेल्वे वर्कशॉपसाठी काम वाढवण्यात आले आहे. याचबरोबर परेल वर्कशॉपचे काम कुर्डूवाडीत आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. पंढरपूर - फलटण नवीन रेल्वे मार्ग मंजूर झाला असून सप्टेंबर अखेर निवेदन निघून डिसेंबर मध्ये काम सुरू होईल. मुंबई - हैदराबाद बुलेट ट्रेन माढा मतदारसंघातून जाण्यासाठी खूप प्रयत्न केले याला देशाचे प्रधानमंत्री मोदी यांनी मंजुरी दिली असल्याने या भागातील प्रवाशांचा सुखकर प्रवास होणार आहे.कुर्डूवाडीत दोन उड्डाणपूल होणार असल्याचे माढा लोकसभेचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले.**



कुर्डूवाडी येथील नूतन रेल्वे स्थानकाचे अमृत भारत रेल्वे स्टेशन योजने अंतर्गत स्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी काम सुरू झाले असून यांचे देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर, सहायक मंडल रेल प्रबंधक एस.एस.परिहार्य, भाजपचे राजकुमार पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, गणेश चिवटे, रिय्याज इनामदार, सुरेश अंबोरे, तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, रेल्वे विभागाचे सहाय्यक मंडल प्रबंधक मनोज पाटेदार, स्टेशन प्रमुख लिला पंडित, आर.एस.भानवसे, तिकीट निरीक्षक, संतोष कुंभार, सुभाष मुळे, एस एस सातव डी.बी. ओहोळ, एस आर वाघमोडे, ऋषिकेश मिना, अनिल कापरे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अप्पर मंडल रेल प्रबंधक एस.एस.परिहार्य यांनी केले.

आमदार बबनराव शिंदे म्हणाले की, मुंबई -परेल येथील वर्कशॉप बंद झाले असून त्याचे काम कुर्डूवाडी रेल्वे वर्कशॉपसाठी मिळाले. स्थानिकांना रोजगार वाढेल. कुर्डूवाडी रेल्वे स्थानक परिसरात साखर कारखान्यांची संख्या जास्त असल्यामुळे साखर निर्यातीसाठी मालवाहतुकीचे अत्याधुनिक पद्धतीचे वाहतूक केंद्र तयार कराण्याची मागणी केली.

यावेळी संजय पाटील भिमानगरकर, भाजपचे उमेश पाटील, दत्ता काकडे, अयुब मुलाणी, संभाजी सातव,महेश गांधी, आनंद टोणपे, गोविंदराव कुलकर्णी, योगेश पाटील, विजयसिंह परबत,प्रदिप सोनटक्के, दता काकडे, भाजपा महिला शहराध्यक्ष प्रतिक्षा गोफणे, स्नेहल पुर्वत, विद्या रणदिवे, अर्जुनराव बागल,संजय गोरे उपस्थित होते. आदर्श पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण गीत सादर केले.

रेल्वेच्या वतीने विविध स्पर्धा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धे तील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र पत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिगंबर सोमासे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर गायकवाड यांनी मानले.



### पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरण कामाचा शुभारंभ

# चाळीस कोटी रुपये खर्चून स्टेशनचा होणार कायापालट

सुराज्य/पंढरपूर

अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी संपन्न झाले. पंढरपूर रेल्वे स्थानकासाठी सुमारे ४० कोटी रुपयांचा निधी खर्च होणार आहे.या रेल्वे स्टेशनच्या नुतनीकरणातून स्टेशनचा कायापालट होऊन पंचतारांकित व्यवस्था सामान्य प्रवाशाला मिळतील. यातून भविष्यात व्यापार वृद्धी देखील होताना पाहायला मिळेल.

अमृत भारत स्टेशन अंतर्गत पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाच्या भूमिपूजन सोहळा आज संपन्न झाला. यावेळी दिल्लीतून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव हे आभासी पद्धतीने उपस्थित होते. अमृत भारत स्टेशन अंतर्गत जिल्ह्यातील पंढरपूर, सोलापूर , कुर्डुवाडी आणि दुधनी अशा चार रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणासाठी सुमारे १४१ कोटी रुपयांचा निधी खर्च होणार आहे. या रेल्वे स्टेशनच्या नुतनीकरणातून स्टेशनचा कायापालट होऊन पंचतारांकित व्यवस्था सामान्य प्रवाशाला मिळतील.

या कार्यक्रमास विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे, आमदार समाधान अवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, संत शिरोमणी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी अरविंद माळी, रेल्वेचे वरिष्ठ मंडळ यांत्रिकी अभियंता राहुल गर्ग, मुख्य वाणिज्य निरीक्षक एच व्ही चांगण, ए डी एन जनार्दन प्रसाद, मुख्य पर्यवेक्षक रमेश काळे, स्टेशन प्रबंधक चनगौडर, रेल्वे पोलीस निरीक्षक जाधव आदींसह मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

यावेळी आमदार समाधान अवताडे म्हणाले, पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने मागील ९ वर्षात ७ राष्ट्रीय महामार्गाशी जोडले गेले आहे. आता रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणानंतर ते देशपातळीवर जाईल. रेल्वे आणि रस्ते विकास झाल्यामुळे पंढरपूरच्या विकासाला चालना मिळाली असून याचा लाभ भाविकांसह शेतकऱ्यांनाही होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून पंढरपूर हे देशपातळीवर एक तीर्थक्षेत्र म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. नॅरोगेज ते इलेक्ट्रीक ब्रॉडगेज असा रेल्वेचा विकास झाल्याने पंढरपूरच्या विकासात मोठी भर पडली असल्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सांगितले.


रेल्वे स्थानकाच्या विकास होत असताना येथे येणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन त्यांची ये- जा सुखकर व्हावी, शहरातील वाहतुकीवर ताण येऊ नये यासाठी रेल्वेने आपल्या हद्दीतील स्टेशन ते भाई राऊळ पुतळा या दरम्यान सध्या अस्तित्वात असलेला रस्ता दुरुस्त करुन प्रवासी आणि स्टेशनकडे येणाऱ्या वाहनांसाठी उपलब्ध करून द्यावा अशी मागणीही माजी आमदार परिचारक यांनी केली.

# उसने पैसे मागितल्याच्या रागातून मारहाण

सुराज्य/सोलापूर

मित्राला दिलेले उसने पैसे मागितल्याच्या रागातून मारहाण केल्याने मित्रावर मैत्री दिनाच्या पूर्वसंध्येला गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अभिजीत मारूती गुंजले (वय-४२,रा.शिवगंगा नगर ४, कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या प्रकरणी श्रीनिवास भिमनपल्ली (रा. इंदिरा नगर, कुमठा नाका) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी अभिजित यांनी त्यांचे मित्र आरोपी श्रीनिवास यांना १० हजार रुपये उसने दिले होते. या पैशासाठी त्यांनी मागणी केल्यानंतर चिडून जाऊन श्रीनिवास याने फिर्यादीला शिवीगाळ करत, दमदाटी करत हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.शिवाय खिशातील दाढी करण्याच्या वस्त्र्याने त्यांच्या हनवटीवर मारून जखमी केले. या प्रकरणी श्रीनिवास भिमनपल्ली याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास नदाफ करत आहेत.



# राहुल गांधी यांच्या सुटकेबदल फेडला नवस

**उ. सोलापूर :** काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी च्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळाल्याने संजय खरटमल यांनी श्री यमाई देवीस नारळाचे तोरण बांधून नवस फेडला आहे.

मोदी आडनावा संदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर गुजरात मधील सुरत न्यायालयाने राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली होती. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात काँग्रेस च्या वतीने याचिका दाखल करण्यात आली होती. काँग्रेस राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाकडून काल स्थगिती मिळाल्याने श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवी ची महापूजा करून,अकरा नारळाचे तोरण सरचिटणीस तथा सामाजिक कार्यकर्ते संजय खरटमल यांनी नवस फेडला.यावेळी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते सतीश पाटील, पोपट साठे उपस्थित होते.



# फुले वाचनालयातर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**वेळापूर :** लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल येथे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेसाठी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.चित्रकला र्स्पधे मध्ये विद्यार्थीनी विविध प्रकारची चित्र काढून आपली कला सादर केली.या स्पर्धेसाठी ग्रंथपाल अजित बनकर,प्रशालेतील शिक्षक वैभव जगताप,अश्वीनी शिंदे,ऐश्वर्या म्हेत्रे,कविता बनकर आदि शिक्षक उपस्थित होते.

# माऊली महाविद्यालयाचा वर्धापन दिन साजरा

**उ. सोलापूर :** श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ,वडाळा संचलित माऊली महाविद्यालयाचा २३ वा वर्धापन दिन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर १९ वा वर्धापन दिन माऊली महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या संयुक्तविद्यमाने उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र साठे, सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन समिती सदस्य व न्यु हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. वैशाली साठे, संस्थेचे संचालक हरिभाऊ घाडगे, प्र.प्राचार्य डॉ. दत्तात्रय हरवाळकर , प्रा. परमेश्वर हटकर, राजेंद्र साठे, सर्व प्राध्यापक उपस्थित होते.


यावेळी डॉ.हरवाळकर यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतात महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आत्तापर्यंत महाविद्यालयाचा विकासाचा आलेख विद्यार्थ्यांसमोर मांडला. प्राचार्या डॉ.वैशाली साठे यांनी सोलापूर विद्यापीठ हे पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर देत आहेत. माऊली महाविद्यालयातही यापुढे कौशल्यावर आधारित विविध कोर्सेस सुरू करावेत असे मत व्यक्त केले.याप्रसंगी महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या बी.ए. भाग १ व बी. एस्सी. भाग १ मधील विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.प्रमोद पाटील, आभार प्रा.डॉ प्रतिभा बिरादार यांनी मानले.

# माळशिरस तालुक्यासाठी पाच कोटींचा निधी मंजूर

सुराज्य/नातेपुते

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत माळशिरस तालुक्यातील ३५ गावांना विविध विकास कामांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याने या गावातील सभागृह बांधणे, रस्ता तयार करणे, सिमेंट काँक्रेट रस्ता तयार करणे, ड्युअल सौर पंप बसविणे, सभामंडप सुशोभीकरण करणे ,सौर दिवे बसविणे, मंदिरासमोर सभा मंडप बांधणे, वाचनालय आदी विविध विकास कामे होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे .

माळशिरस चे आ. राम सातपुते यांच्या प्रयत्नातून व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या गावांचा, वस्त्यांचा विकास करण्याकरिता या घटकांना मूलभूत सुविधा पुरविण्याकरिता ५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. यामध्ये रस्ते कामासाठी झिंजेवस्ती, विझोरी, चाकोरे, गोरडवाडी, शिंगोर्णी, दत्तनगर खंडाळी, सुळेवाडी, मगरवाडी, दहिगाव, काळमवाडी, बचेरी, कण्हेर या गावांसाठी १ कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



सभागृहासाठी गारवाड, कचरेवाडी, मळोली, कोथळे, गुरसाळे ५० लाख. सभा मंडप बाभूळगाव, धर्मपुरी जळभावी, विजयवाडी, फोंडशिरस, फडतरी, उंबरे दहिगाव, मांडवे, डोंबाळवाडी खु, मोरोची, धानोरे, पठाणवस्ती, जाधववाडी, तांबेवाडी, दहिगाव, कोंडबावी, सदाशिवनगर १ कोटी ७० लाख. सुशोभीकरण मोटेवाडी मा. तरंगफळ, भांब, माळशिरस ९० लाख. सौरदिवे मानकी , पिंपरी कोळेगाव, कोथळे, नातेपुते, कारूंडे ६० लाख. स्वच्छतागृह तिरवंडी १० लाख असा एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे .



# माळशिरस ते पिलीव एसटी त्वरित चालू करा

## अन्यथा तीव्र आंदोलन करणार : किरण साठे

सुराज्य/पिलीव

रा. प. अकलूज चे आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे यांना बहुजन ब्रिगेडचे अध्यक्ष किरण साठे यांनी निवेदन देवून माळशिरस ते मोटेवाडी,तरंगफळ चांदापुरी मार्गे पिलीव एसटी बस सेवा चालू करण्याची मागणी केली आहे. यावेळी आनंद मिसाळ, इरफान बागवान, नारायण डांगे, शिवाजी गेजगे, आदित्य काकडे, साहिल अडगळे, सचिन साळुंखे इत्यादी उपस्थित होते.

माळशिरस ते पिलीव एसटी बससेवा सद्या बंद असून या एसटीच्या माध्यमातून माळशिरस वरून पिलीव येथे जात असताना संबंधित मार्गावर मोटेवाडी,तरंगफळ,चांदापुरी या गावांचा समावेश होत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

संबंधित गावातून एसटीच्या माध्यमातून विद्यार्थी आणि इतर प्रवाशांची सोय करण्यासाठी एसटी सेवा सुरू होती,माळशिरस ते पिलीव एसटी ही माळशिरस वरून संध्याकाळी ५ वाजता सुटून पिलीव मध्ये मुक्कामी होती त्यानंतर ती सकाळी ९ वाजता पिलीव वरून माळशिरस ला रवाना होत होती.त्यामुळे विद्यार्थी,तसेच माळशिरस येथे बाजाराला येणाऱ्या तसेच माळशिरस येथील कोर्ट,सरकारी कार्यालयात काम असणाऱ्या जनतेला दिलासा मिळत होता. सद्या पावसाळा असल्याने प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने तात्काळ माळशिरस ते पिलीव एसटी सेवा पत्रात नमूद केलेल्या वेळेनुसार चालू करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा बहुजन ब्रिगेडचे अध्यक्ष किरण साठे यांनी निवेदनात दिला आहे.



# अकरा गावात एक हजार एक उजळणी वाटप

सुराज्य/उ. सोलापूर

उत्तर तालुक्यातील मार्डी येथील पृथ्वीराज माने युवा मंच शाखेच्या वतीने अजित भिंगारे - पाटील व पृथ्वीराज माने युवा मंच तालुका सचिव भगवान कदम यांनी माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त मार्डी केंद्रातील ११ गावां मधील जीप शाळेतील इयत्ता १ली ते ४ ती पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १००१ उजळणीचे वाटप अध्यक्ष सुनील जाधव यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी समन्वयक- उमेश भगत,अजित पाटील, अजय सोनटक्के,विशाल भोसले,शहाजी भोसले,युवराज जगताप,सागर तांबे, महेंद्र खटके, किरण बंडगर,विलास पवार, चेअरमन बाबासाहेब पाटील, माजी सरपंच मनोहर जगताप,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नामदेव गवळी, माजी संचालक बाळासाहेब पाटील, संभाजी पाटील,ग्रामपंचायत सदस्य अरुण मुडके, वसंत हजारे, पोपट साठे, संजय खरटमल,अनिल घोंगडे, हमीद कुडले, बाळासाहेब कदम, दिगंबर जगताप, सुखदेव महापूरे,दत्ता गायकवाड,भैय्या काळे, अनंत परीट,बबन महापूरे उपस्थित होते.

# अज्ञात चोरट्याने तांब्याच्या तार चोरल्या

सुराज्य/सोलापूर

बाळे येथील एसटी स्टॅन्ड जवळ लावलेल्या तीन एसटी गाडीच्या बॅटरी पासून स्वीच कडे जाणाऱ्या तांब्याच्या धातूची प्रत्येकी साडेतीन फुटाची केबल अज्ञाताने चोरली. याबाबत विठ्ठल रामचंद्र कांबळे (रा.संतोष नगर,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास दराडे करत आहेत.ही घटना ५ ऑगस्ट रोजी घडली.

# जलसंधारण कामांवरील स्थगिती उठवली

## शेती व पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार: आ.बबनदादा



सुराज्य/टेंभुर्णी

माढा विधानसभा मतदारसंघातील माढा व पंढरपूर तालुक्यातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडील कामांना मे-जून,२०२२ या वर्षात १५ कोटी ३४ लाख इतक्या रक्कमेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. परंतू राज्यात सत्तांतर झाल्याने मंजूर कामांना स्थगिती देण्यात आली. अखेर या मंजूर कामांवरील स्थगिती शासन आदेशानुसार उठली असल्याची माहिती आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहिती आ.शिंदे म्हणाले की, माढा मतदारसंघातील माढा व पंढरपूर तालुक्यातील काही भाग आवर्षण प्रवण क्षेत्रात येत आहे, त्या ठिकाणी पाण्याची भीषण टंचाई आहे. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अतंर्गत १२ जलसंधारण कामांना मे-जून, २०२२ या वर्षात प्रशासकीय मान्यता मिळाली होती. परंतू जलसंधारणांच्या कामांना स्थगिती देण्यात आली होती. नुकतेच पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचेकडे प्रत्यक्ष भेटून पत्राव्दारे पाठपुरावा करणेत आला.

त्यानुसार माढा विधानसभा मतदारसंघातील १५ कोटी ३४ लाख इतक्या रक्कमेची जलसंधारण कामावरील स्थगिती दि.३१-०७-२०२३ रोजीच्या शासन आदेशानुसार उठली आहे. जलसंधारण कामांतर्गत रुपांतरीत साठवण तलाव, गेटेड चेक डॅम, साठवण बंधारा व इतर कामांचा समावेश आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार असल्याची माहिती आ.शिंदे यांनी दिली.

**माढा मतदारसंघातील जलसंधारणाची होणार कामे**

**माढा तालुका** - (१) वडाचीवाडी रुपांतरीत साठवण तलाव - रक्कम रु. ४,२८,४६,०१८ , (२) पालवण रुपांतरीत साठवण तलाव - रक्कम रु.३,५०,२१,४२३ (३) चव्हाणवाडी क्रं.१ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,१४,१६,६७५, (४) चव्हाणवाडी क्रं.२ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,३५,२७,२२१, (५) चव्हाणवाडी क्रं.३ गेटेड चेक डॅम - रक्कम रु.१,३०,१२,१६७, (६) चव्हाणवाडी क्रं.४ (अरुण सदाशिव चव्हाण गट नं.१३६) गेटेड चेक डॅम - रक्कम रु. ४४,८६,१९०

**पंढरपूर तालुका** - (१) वाडीकुरोली गेटेड साठवण बंधारा.- रक्कम रु. ९०,८०,८६६, (२) व्होळे क्रं. १ साठवण बंधारा- रक्कम रु. ६५,७३,७०३, (३) व्होळे क्रं. २ साठवण बंधारा- रक्कम रु. ६५,७४,२०४ (४) भोसे (क) सटवाई मळा, गेटेड चेक डॅम - रक्कम रु. ४२,६५,१८२ (५) मेंढापूर क्रं.१ गेटेड चेक डॅम - रक्कम रु. ३२,९३,४६७ (६) मेंढापूर क्रं.२ गेटेड चेक डॅम - रक्कम रु. ३३,०६,३%१.




# मनपा, जि.प. बासनात...; चर्चा लोकसभेचीच

**शहरी किंवा ग्रामीण जनतेला मुलभूत नागरी सुविधा पुरविण्याची खरी जबाबदारी त्या त्या शहरातील महानगरपालिकेची आणि ग्रामीणची जबाबदारी जिल्हा परिषदेची. या सुविधा पुरवणाऱ्या प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी लोकशाही पध्दतीने महापालिका, नगरपालिका व नगर पंचायतीत नगरसेवक निवडले जातात. तसे जिल्हा परिषदेत गटनिहाय सदस्य निवडले जातात. जनतेची गाऱ्हाणी ही मंडळी प्रशासनापर्यंत पोहचवून त्या सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. पण मुदत संपूणही गेल्या वर्ष-दीड वर्षांपासून या स्थानिक स्वराज्य संस्थावर सदस्यच नसल्याने प्रशासनाची अक्षरश: मनमानी चालल्याचे दिसून येत आहे.**




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

यामुळे स्थानिक जनता मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहात आहे. याकडे कुणाही राज्यकर्त्यांचे लक्ष नाही. आजमितीस राज्यातील १८ महानगरपालिकांतील सदस्यांची मुदत फेब्रुवारी २०२२ लाच संपली आहे. २५ जिल्हा परिषदांची मुदतही संपून जमाना झाला आहे. शिवाय राज्यातील तब्बल ९२ नगरपरिषदा आणि ४ नगर पंचायती निवडणुकांच्या प्रतिक्षेत आहेत. सर्व महापालिकांवर आणि जिल्हा परिषद, नगरपरिषदांवर प्रशासकीय राजवट सुरु आहे. यामुळे एकीकडे प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची बेफिकीर वृत्ती आणि चंगळपणा वाढत असताना दुसरीकडे सर्वसामान्य जनते नागरी मुलभूत सुविधांपासून वंचित रहात असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिथं माजी लोकप्रतिनिधींची गाऱ्हाणी ऐकली जात नाही, तिथं सर्वसामान्य जनतेचे कोण ऐकणार?. खरंतर वर्ष-दीड वर्षांचा काळ गेला. राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांचे नेते पक्ष फोडाफोडी, आमदारांची खेचाखेची, सत्ता स्थापन करणे, मंत्रीपदे लाटणे आणि पक्षाला सोयीचे होतील असे निर्णय घेऊन नजिक येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचा तयारी करणे, यातच मश्गुल झाले आहेत. त्यांना लटकत असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी काहीही देणेघेणे नाही, असेच एकंदर चित्र दिसत आहे. एका अर्थांने त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना बासनात गुंडाळून पक्ष आणि आपल्या सोयीच्या लोकसभा निवडणुकाविषयीच जोरकस चर्चाच नव्हे तर तशी तयारीही सुरु केली आहे. यामुळे तळागळातील सर्वसामान्य जनतेचा आणि निवडणुकीच्या तयारीत असलेल्या सर्वसामान्य इच्छुक कार्यकर्त्यांचा आवाज कोण काढणार?, हा प्रश्न आहे.

### न्यायालयात तारीख पे तारीख

आघाडी सरकारच्या काळात प्रत्येक महापालिका क्षेत्रात पूर्वीच्या चारऐवजी तीन सदस्यीत प्रभाग करण्यात आला. त्यानुसार प्रशासनाने निवडणुकीची तयारी केली. प्रभाग रचना, आरक्षण, सोडत, प्रभागनिहाय मतदारयाद्या ही सर्व प्रक्रिया पूर्ण केली. गुडघ्याला बाशिंग बांधून तयारीत असलेल्या इच्छुकांनी निवडणुकीची तयारी सुरु केली. कार्यकर्त्यांची फळी उभी केली. पाटर्यांचा सिलसिला सुरु झाला. आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुढे आला. त्यानंतर प्रशासनाने खास ओबीसीसाठीची सोडतही काढली. इतक्यात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा ओबीसी मंडळींनी ऐरणीवर घेतला. आणि तो न्यायालयात गेला. सध्या तो सर्वोच्च न्यायालयात 'तारीख पे तारीख' हे धर्तीवर चालत आहे. दरवेळेच्या सुनावणीला आता ओबीसी आरक्षणाबाबतचा आता निकाल लागणार, असे वाटायचे, पण कुठले काय?. दरवेळेस सुनावणीची तारीख पुढे ढकलली जायची. आता परवाच ४ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार होती. पण पुन्हा ती दोद आठवड्यांनी पुढे गेली आहे. आता तेव्हा तरी ओबीसीच्या बाबतीत निकालाचा सोक्षमोक्ष लागेल की, पुढे ढकल स्टार्टचा गिअर पडणार, हे पहावे लागेल.

### गुंतागुंतीचा खेळ; न्यायालयावर खापर

ओबीसी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात तारखांवर तारखा पडत असताना दुसरीकडे प्रारूप प्रभागरचना रद्द करून नव्याने प्रक्रिया राबविण्याबाबत राज्य सरकारने घेतलेल्या अधिकाराच्या निर्णयाविरोधात होणारी सुनावणीही लांबल्याने आणि पावसाळ्यात निवडणुका घेणे शक्य नसल्याच्या कारणातून आता महापालिकांच्या निवडणुका दिवाळीनंतरच होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. अंतिम प्रारूप प्रभागरचना दुरुस्तीसह प्रसिद्धीची वेळ आली असताना अचानक राज्य सरकारने ओबीसी आरक्षण नसल्यामुळे विधिमंडळात नवीन विधेयकाद्वारे कायदा मंजूर करीत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार आपल्याकडे घेतले. त्यामुळे यापूर्वीची प्रभागरचना रद्द होऊन राज्य सरकारने स्वत: नवीन प्रभागरचना करण्याचा निर्णय घेतला. त्याला सर्वोच्च न्यायालयात पुन्हा आव्हान देण्यात आले आहे. हा सर्व गुंतागुंताचा खेळ सुरु झाला आहे. पण याचे खापर मात्र सरकार न्यायालयावर फोडताना दिसून येत आहे.

### राजकीय कचाट्यात प्रभागरचना

महापालिका परिक्षेत्रातील प्रभागरचना नेहमीच राजकीय कचाट्यात अडलेली आपणास दिसते. राज्यात ज्यांची सत्ता त्यांच्या पक्षातील स्थानिक नेत्यांना विश्वासात घेऊन प्रशासन सोयीची प्रभागरचना करण्यासाठी तत्परता दाखविते. तसे प्रशासनावर आरोप झाले आणि ते बऱ्याच ठिकाणी सिध्दही झाले आहेत. महाविकास आघाडी सरकारने पुणे व मुंबई वगळता सोलापूरसह इतर महापालिका क्षेत्रातील प्रभागरचना तीन सदस्यीय पध्दतीची केली. त्यानुसार प्रक्रियाही पूर्ण केली. दरम्यान राज्यात युतीची सरकार आले. त्यांनी आघाडी सरकारने आखून दिलेल्या मनपा निवडणूक प्रक्रियेला खो दिला आणि पूर्वीप्रमाणे चार सदस्यीय प्रभाग करण्याचा निर्णय घेतला. झाले प्रशासनाने तीन सदस्यीय पध्दतीने केलेल्या साऱ्या प्रक्रियेवर पाणी पडले. नंतर युती सरकारने घेतलेल्या निर्णयाची पुढे काहीच हालचाल दिसून येत नाही. आता तर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात गेल्याने सरकारचे हातच वर केले आहेत.

### हम तय्यार है...!

स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्यांच्या निवडणुका गेल्या खड्ड्यात, असे सोयीचे राजकीय गणित मांडून सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांवर डोळा ठेवला आहे. त्या दिशेने त्यांची वाटचाल सुरु असून तशी तयारी केली जात आहे. यात भाजपाचे बाजी मारली आहे. राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघासाठी प्रमुखांची त्यांनी नियुक्ती केली आहे. सोलापूरची जबाबदारी विक्रम देशमुख यांच्याकडे तर माढ्याची जबाबदारी प्रशांत परिचारक यांच्यावर सोपवली आहे. त्यातच आता माजी खा. अमर साबळे यांची समन्वयक म्हणून तर राजकुमार पाटील यांच्या माढ्याची समन्वयक म्हणून जबाबदारी दिली आहे. सोलापूर मध्यच्या आ. प्रणिती शिंदे यांना काँग्रेस पक्षाने पुढे चाल देऊन पुणे आणि मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी नियुक्ती करुन त्यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. यामुळे भाजपा आणि काँग्रेसने लोकसभेसाठी 'हम तय्यार है' चा नारा दिल्याचे दिसून येते.

# लोकसभेसाठी बीआरएस आणि एमआयएमही तयारीत

**लोकसभा निवडणुकीसाठी आता केवळ ८ ते ९ महिन्यांचा कालावधी बाकी आहे. गतवेळी सोलापूर लोकसभेची निवडणूक वंचित आघाडीमुळे तिरंगी झाली होती. आता वंचित सोलापूर लोकसभेतून माघार घेत असल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी बीआरएस आणि एमआयाएमनेही लोकसभेची तयारी केल्याने ही निवडणूक यंदा चौरंगी होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

अजित उंब्रजकर

एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या सोलापूर लोकसभेवर गेल्या १० वर्षांपासून भाजपाचा ताबा आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने काँग्रेसवर सहज विजय मिळवला होता. २०१४ मध्ये भाजपचे शरद बनसोडे आणि काँग्रेसकडून माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यात दुहरी लढत झाली होती. तर गतवेळी भाजपचे डॉ. महास्वामी, काँग्रेसकडून पुन्हा सुशीलकुमार शिंदे आणि वंचितकडून प्रकाश आंबेडकर यांच्यात तिरंगी लढत झाली होती. या दोन्ही लढतीमध्ये भाजपाने लाखांहून जास्त मतांनी विजय मिळवला होता. याला मोदी फॅक्टरही कारणीभूत होता. आता २०२४ ची लोकसभा निवडणूक जवळ आली आहे. वरिष्ठ पातळीवर काँग्रेस आणि वंचित आघाडी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यामुळे वंचित आघाडी सोलापूर लोकसभेतून माघार घेईल असे बोलले जात आहे. मात्र आता लोकसभा निवडणुकीत भाजप आणि काँग्रेससमोर वंचित ऐवजी बीआरएस आणि एमआयएमचे आव्हान असणार आहे. बीआरएस आणि एमआयएमने आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे.

बीआरएसने कमी वेळात सोलापुरात चांगलीच हवा केली आहे. भाजपाचे तीन माजी नगरसेवक बीआरएसमध्ये गेले आहेत. आगामी काळात आणखी काही माजी नगरसेवकांसह काही नेते बीआरएसमध्ये जातील, असे बोलले जात आहे. पक्षप्रमुख के. चंद्रशेखर राव सोलापुरात सभाही घेण्याच्या तयारीत आहेत. बीआरएसने निवडणूक लढवण्याची चाचपणीही सुरू केली आहे. त्यादृष्टीने उमेदवाराची शोध मोहीमही सुरू आहे. बीआरएस हा तेलुगु भाषिक पक्ष आहे. सोलापुरात तेलुगु भाषिक भाजपाचा मतदार आहे. अशात जर बीआरएसने लोकसभा निवडणुकीत तगडा उमेदवार उभा केला तर त्याचा फटका भाजपला बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे बीआरएस पाठोपाठ एमआयएमनेही लोकसभा लढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यांचीही उमेदवारांची शोधाशोध सुरू आहे. फारूक शाब्दी यांच्यावर खा. ओवेसी यांनी ही जबाबदारी सोपवली आहे. सोलापुरात खास करून शहर मध्यमध्ये मुस्लिम समाज मोठा आहे. मागील दोन विधानसभा निवडणुकीत एमआयएमने शहरमध्यमधून ३५ हजारांहून अधिक मते घेतली होती. त्यामुळे एमआयएमच्या उमेदवाराचा फटका काँग्रेसला बसणार हे निश्चित. एकंदरित भाजप आणि काँग्रेसबरोबरच यंदा बीआरएस व एमआयएमचेही उमेदवार रिंगणात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२४ लोकसभा निवडणूक चौरंगी होईल असे बोलले जात आहे.

### भाजपाचे पारडे जड

यंदाच्याही लोकसभा निवडणुकीत भाजपचे पारडे जड असणार आहे. भाजपबरोबर आता राष्ट्रवादीही असल्याने काँग्रेसला ज्या भागातून मतदान जास्त होते अशा मोहोळमध्येही यंदा भाजपला फायदा होणार आहे. येथील माजी आ. राजन पाटील हे अजितदादांच्या गटात गेले आहेत. त्यामुळे साहजिकच तेही भाजप उमेदवारालाच साथ देणार हे निश्चित.

# अभिजीत पाटलांची मंगळवेढ्यात साखर पेरणी



सूरज सरवदे

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने मंगळवेढा तालुक्यातील सर्वच गावात बॅनरबाजी करण्यात आली आहे. त्यांनी एका अर्थाने मंगळवेढा तालुक्यात साखर पेरणी सुरू केल्याची चर्चा सुरु झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचा विचाराचा मतदारसंघ म्हणून पंढरपूर -मंगळवेढा मतदारसंघाकडे पाहिले जाते. सुरुवातीपासून पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघ शरद पवार यांच्या पाठीमागे ठामपणे उभा राहिला आहे. निवडणुकीला जवळपास दीड वर्षाचा कालावधी असतानाच शरद पवार यांनी अभिजीत पाटील यांची उमेदवारी जाहीर सभेत जाहीर केली होती. तेव्हा अभिजीत पाटील यांच्या उमेदवारी चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात झाली होती

अभिजीत पाटील यांचा वाढदिवस नुकताच झाला. वाढदिवसाच्या निमित्ताने संपूर्ण मंगळवेढा शहर आणि तालुक्यात त्यांचे बॅनर झळकले आहेत. त्यामुळे चौकाचौकात, हॉटेलमध्ये, चहाच्या टपरीवर पाटील यांच्या विषयी चर्चा रंगू लागल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी अभिजीत पाटील यांच्याकडे खूप कमी कालावधी आहे. पंढरपूर तालुक्यासह मंगळवेढा तालुक्यात त्यांचा चेहरा आता पोहोचला आहे. मात्र त्यांच्यासाठी मंगळवेढा शहर आणि तालुका हा सोपा नसणार आहे. अभिजीत पाटील यांना तालुक्यातील नागरिकांची नाळ जोडावी लागेल. त्यांच्या समस्या जाणून घ्याव्या लागतील. त्यांना आशावाद द्यावा लागेल. सुख दुःखात सहभागी व्हावं लागेल तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांना देखील दिवस-रात्र एक करून प्रचारासाठी उतरावे लागेल.

### भालकेंमुळे पाटलांचा मार्ग मोकळा

ज्यावेळी शरद पवार यांनी अभिजीत पाटील यांच्या उमेदवारांचे संकेत दिले होते. त्यावरून भगीरथ भालके यांनी पत्रकारांसमोर एबी फॉर्म दिला आहे का?, अशी टीका केली होती. मात्र ज्यावेळी आपलं तिकीट कापले जाईल, अशी भिती झाल्यामुळे त्यांनी भारत राष्ट्र समिती या पक्षात जाणे पसंत केले. पण मंगळवेढा शहर आणि तालुका हा राष्ट्रवादीसाठी पोषक आहे. येथील मतदार राष्ट्रवादीला मतदान करतात, असा इतिहास आहे. त्यामुळे भगीरथ भालके भारत राष्ट्र समितीमध्ये गेल्यामुळे अभिजीत पाटील यांना मंगळवेढा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगले पाठबळ मिळू शकते, असे चित्र आहे.

# बदलत्या राजकीय समीकरणांचा मोहिते-पाटलांना फायदा होणार

**एकट्या भाजपामध्ये असताना मोहिते-पाटलांनी आपली राजकीय किमया दाखवत विविध निवडणुकात आपले प्रभुत्व सिद्ध केले. आता तर राष्ट्रवादीचा अजित पवार गटच भाजपात सामील झाल्याने जिल्ह्याच्या राजकीय पटलावर मोहिते-पाटलांना जुन्या सहकाऱ्यांची आणखी ताकद मिळणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मोहिते-पाटीलच जिल्ह्याच्या राजकारणात किंगमेकर ठरतील अशी परिस्थिती आहे.**

डी.एस.गायकवाड

'मोहिते-पाटील बोले आणि जिल्हा हाले' अशीच एकेकाळी सोलापूर जिल्ह्यात परिस्थिती होती. जिल्ह्याचा सर्व कारभार अकलूज इथूनच हाकला जात होता ही वस्तुस्थिती होती. पण मागील काही वर्षाच्या काळात मोहिते-पाटलांचे खच्चीकरण करण्याची एकही संधी काही राजकीय मंडळीनी सोडली नाही. मोहिते-पाटलांनी नेहमीच सर्वांना विश्वासात घेऊन जिल्ह्याच्या विकासात मोलाची कामगिरी बजावली. पण कालांतराने जिल्ह्यातील जेष्ठ मंडळी निर्णय प्रक्रियेपासून दूर होत गेल्याने व युवक नेतृत्वांचा ताळमेळ हरवल्याने संभ्रमावस्था वाढत गेली. त्यांच्या विरोधकांना वरिष्ठ पातळीवरून ताकद मिळू लागली. यातून मग मोहिते-पाटील भाजपावासी झाले आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून ते विकासाला गवसणी घालू लागले. त्यांनी भाजपासाठी सक्षम बूथ बांधणी करीत भाजपाची स्थिती ही मजबूत केली.





बदलत्या राजकीय परिस्थितीत आता अजित पवार यांनी आपल्या गटाला सोबत घेऊन भाजपाशी हात मिळवणी केल्याने आता मोहिते-पाटलांना देखील उर्जितवस्था मिळणार आहे. मुळात मोहिते-पाटील हे तर राष्ट्रवादीचे फाउंडर लिडर होते. त्यामुळे त्यांचे या पक्षातील सर्वांबरोबरच सख्य आहे हे अनेक वेळा दिसले आहे. सिद्ध झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी बरोबर संसार करताना जिल्ह्यात त्यांना आणखी बळ मिळणार आहे. मोहिते-पाटलांनी 'राष्ट्रवादी टू भाजपा' असा प्रवास केल्याने त्यांच्या स्नेहसंबंधाचा उपयोग जिल्ह्यासाठी होऊ शकतो आणि भविष्यात राजकीय किंगमेकर म्हणून त्यांच्यावर जबाबदारी पडू शकते.

### अजित पवार गटाची जबाबदारी रामराजेंवर?

- रामराजे नाईक निंबाळकर यांचे सोलापूर जिल्ह्याशी घनिष्ठ सबंध असल्याचे नेहमी बोलले जाते. माढा लोकसभा किंवा सोलापूर जिल्ह्यातील राजकारणासंदर्भात निर्णय प्रक्रियेची राष्ट्रवादीची जबाबदारी रामराजे नाईक निंबाळकर यांच्यावर देण्यात येईल अशी माहिती आहे. कारण फलटण, माण खटाव तालुका हे माढा लोकसभेत येत असल्याने त्यांच्यावर ही जबाबदारी राष्ट्रवादी अजित पवार गट देऊ शकते. त्यांचे आणि मोहिते-पाटील यांच्याबरोबर देखील त्यांचे स्नेहाचे संबंध पूर्वीपासून होते आजही आहेत.




# बीआरएसची आता दक्षिण मोहीम; दोन दिवसात राजकीय भूकंप...



दीपक शेळके

आषाढी वारीच्या निमित्ताने 'श्री विठ्ठलाचे नाव... मनी निवडणूकीचा भाव' ठेऊन तब्बल पाचशे गाड्याचा ताफा घेऊन आलेल्या बीआरएस पक्षाने मोठा झंझावात केला. सोलापुरातील शहर उत्तर विधानसभा आणि शहर मध्य विधानसभा आणि पंढरपूर विधानसभा येथील संभाव्य उमेदवार गळाला लागल्यानंतर आता बीआरएसने दक्षिण मोहिम हाती घेतली आहे. दक्षिण विधानसभा मतदारसंघासाठी तगडा आणि 'लक्ष्मीपूत्र' नेता गळाला लागला आहे. त्यामुळे दक्षिण मोहिम देखील फत्ते करुन बीआएस दोन दिवसात राजकीय भूकंप घडविण्याच्या तयारीत आहे.

बीआरएस पक्षाने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानत महाराष्ट्रात लक्ष घातले आहे. राज्यातील लोकसभा, विधानसभा, आणि स्थानिक स्वराज्य, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती निवडणुकीची तयारी चालू केली आहे. बीआरएसची 'मिशन सोलापूर' ही देखील सुरुवात झाली आहे. आता बीआरएसची मोहिम दक्षिण विधानसभा मतदार संघावर आहे. यापूर्वी शहर उत्तर, शहर मध्य, आणि पंढरपूर विधानसभा मोहिम यशस्वी केल्यानंतर बीआरएसची दक्षिण मोहिम सुरु केली आहे. या मोहिमेची जबाबदारी ओबीसी समाजाच्या एका तरूण शेतकरी सुपूत्रांच्या खांद्यावर दिली आहे. त्यांनी यापूर्वी सोलापूर महानगरपालिकेची दोन वेळा निवडणूक लढवली आहे. एकदा शिवसेना तर एकदा भाजपाच्या वतीने मात्र थोड्या मताने पराभव झाला होता. त्यांची व बीआरएस पक्षाचे सर्वे सर्वा तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखरराव (केसीआर) यांची भेट झाली आहे. त्यांना दक्षिण विधानसभा मतदारसंघात कामाला लागा, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे बीआरएसचे दक्षिण सोलापुरातील ओबीसी समाजातील या तरूणांला संभाव्य उमेदवार म्हणून पाहिले जात आहे. त्यांनी सामाजिक संस्था आणि विविध मंडळाच्या माध्यमातून तसेच तेलंगाणामधील बीआरएसच्या ४५० योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानत दक्षिण विधानसभा मतदारसंघात भेटीगाठीचा दोन फेऱ्या पूर्ण केल्या आहेत. त्यांनी दीड लाख सभासद नोंदणीचे उद्दिष्ठ पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. ओबीसी चेहरा असलेल्या या शेतकरी सुपूत्राच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन दक्षिण विधानसभा आणि अक्कलकोट तालुक्यातील जवळपास १२० ग्रामपंचायतीचे सरपंच आणि सदस्य बीआरएसध्ये प्रवेश करणार असल्याचे बोलले जात आहे.

### दक्षिणचे 'वऱ्हाड' तेलगंणाला जाणार

दक्षिणचे वऱ्हाड दोन दिवसात तेलंगणाच्या दौऱ्यावर जाणार आहे. यावेळी १०० ते २०० गाड्यांचा ताफा नेऊन कार्यकर्त्यांचे शक्तीप्रदर्शन केले जाणार आहे. हे सर्वजण मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या उपस्थितीत बीआरएसमध्ये प्रवेश करणार आहेत. या सदस्यांच्या बीआरएस प्रवेशामुळे दक्षिणमध्ये मोठा राजकीय भूकंप होणार असल्याने बीआरएसी सोलापूर, पंढरपूरनंतर दक्षिण मोहिम यशस्वी होण्याची शक्यता आहे.